# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१८ / आषाढ १९, १९४० ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांमधील नागरिकांना अतिरिक्त मालमत्ता कराची आकारणी केल्याबाबत**

**(१) * ११७५६८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट केलेल्या २७ गावांमधील नागरिकांना महानगरपालिका प्रशासनाने अतिरिक्त मालमत्ता कर आकारल्या प्रकरणी २७ गावातील नागरिकांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्तांना घेराव घालून मालमत्ता कर आकारणी कमी करा अथवा २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका करा अशा घोषणा दिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार २७ गावांतील मालमत्ता कराची दर आकारणी कमी करण्याबाबत किंवा स्वतंत्र नगरपालिका करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या २७ गावातील पाहणी दौऱ्या दरम्यान काटई या गावातील स्थानिक नागरिकांनी मालमत्ता कराची देयके कमी करण्याबाबत तसेच सदर २७ गावांची नगरपालिका स्थापन करण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना विनंती केली, ही वस्तुस्थिती आहे.
(२) • ग्रामपंचायत असतांना २७ गावातील मालमत्ता कराची आकारणी १ ते २ रूपये प्रति चौरस फुट या दराने केवळ सामान्य कर म्हणून करण्यात येत होती.

• सदर २७ गावांचा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत दि. १ जून, २०१५ पासून समावेश करण्यात आलेला आहे.

• सदर गावे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत मालमत्ता कराची देयके ग्रामपंचायतीने दिलेल्या मालमत्ता कराएवढीच दिलेली आहेत.

• दोन वर्षानंतर मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अ चे तरतूदीनुसार म्हणजेच सामान्य कराचे २०% अधिक उर्वरित सर्व कर या नुसार करण्यात येते.

• महापालिका सर्वसाधारण सभेने महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व करांच्या २०% प्रमाणे कर आकारणी करून दुरूस्तीची बिले निर्गमित करण्याबाबत दि. १९.०४.२०१८ रोजी ठराव क्र.१२ पारीत केला.

• तथापि, सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अ मधील तरतूदीच्या विसंगत असल्याने त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. सदर ठराव विखंडनासाठी दि. १९.०६.२०१८ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्यावर पुढील नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

• उपरोक्त नमूद २७ गावांची नगरपरिषद स्थापन करण्यासाठी दि.०७.०९.२०१५ रोजी प्रारूप अधिसूचना निर्गमित केलेली असून त्याअनुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात दरवर्षी रस्त्यांवरील खड्ड्यांच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असल्याबाबत

**(२) * ११८९६९ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात पावसाळ्यापूर्वी दरवर्षी रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षीही रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून रुपये २८ कोटींची निविदा काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणात खड्ड्यांवर खर्च करूनही खड्डे कायम राहत असल्याने या कामात गैरव्यवहार होत असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका प्रशासन यावर्षी खड्ड्यांची कामे योग्य पद्धतीने करण्याबाबत कंत्राटदारांना निर्देश देणार आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार कोणत्या प्रकारचे करार महानगरपालिका व कंत्राटदारांमध्ये करण्यात आले आहेत,

(६) असल्यास, मुंबईतील रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी व वाहतूक कोंडी दूर करण्याच्यादृष्टिने महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) मुंबई शहरात रस्त्यांवर पडणारे खड्डे पावसाळ्यापूर्वी दुरुस्त करण्यात येतात हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी सन २०१८ मध्ये अंदाजे ९.३० कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेल्या रस्त्यांवर विविध उपयोगिता सेवांमार्फत वेळोवेळी रस्ते खोदले जातात. तसेच ज्या रस्त्यांचा दोषदायित्व कालावधी संपलेला असतो अशा ठिकाणी वाहनांच्या वर्दळीमुळे पावसाळयादरम्यान खड्डे पडतात.

सदर खड्डे पाऊस थांबल्यानंतर महानगरपालिकेमार्फत त्वरीत बुजविण्यात येतात. सन २०१८ मध्ये महानगरपालिकेने खड्डे बुजविण्यासाठी विशिष्ट रसायने वापरुन नवीन पध्दतीचे मिश्रण तयार केले आहे. सदर मिश्रण पावसात सुध्दा वापरता येते.

(४) पावसाळयातील कामे पार पाडण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारांना योग्य ते निर्देश देण्यात आले आहेत.

(५) सदर कामांसाठी कंत्राटदारांकडून दोन वर्षे हमी कालावधीचा करार करण्यात येत आहे.

(६) व (७) मुंबईतील रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी व वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• पावसाळयामध्ये रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांमध्ये मागील वर्षी पावसात तग धरु शकतील अशा शीत डांबर मिश्रित खडीची (Asphalt Cold Mix) चाचणी घेण्यात आली आहे.

• सदर शीत डांबर मिश्रित खडीचे उत्पादन महानगरपालिकेच्या मालकीच्या धुम्रजंतू संयंत्र (Asphalt Plant) मधून करण्याकरिता संयंत्रामध्ये योग्य असे बदल करण्यात आले आहेत.

• त्यानुसार सदर संयंत्रामधून शीत डांबर मिश्रित खडीचे उत्पादन तयार करण्यात येऊन त्याचा उपयोग पावसाळयात पडणारे खड्डे भरण्याकरिता करण्यात येत आहे.

• वाहतूक पोलीसांशी संपर्क साधून वाहतूक कोंडी सोडविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

• विहित रस्ते सीमारेषेप्रमाणे सेटबॅक ताब्यात घेऊन रस्ते रुंदीकरणाचे काम सुरु आहे.

• विविध ठिकाणी सर्वेक्षण करुन पुल उभारणी करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

----------------

## पालघर जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा सुधारणेबाबत

**(३) * १२२१५२ श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील ४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची (आयटीआय) दुरवस्था झाली असून सदर संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आयटीआय संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्यामुळे जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि पाली (ता.वाडा) अशा चार ठिकाणच्या औद्योगिक संस्थांची दुरवस्था झाली असून संपूर्ण पालघर जिल्हयात वसई, पालघर, जव्हार, मोखाडा, पाली, विक्रमगड, वाणगांव आणि तलासरी अशी ७ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त केंद्राची व्यवस्था पाहण्याकरिता जिल्हा औद्योगिक अधिकारीच नेमण्यात आलेला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदरहु औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थिती व दर्जा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) संपूर्ण पालघर जिल्ह्यात वसई, पालघर जव्हार, मोखाडा, वाडा (पाली येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाडा कार्यरत आहे), विक्रमगड, वाणगाव आणि तलासरी अशी ८ औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे आहेत. तसेच जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा अशा चार ठिकाणच्या औद्योगिक केंद्रांची दुरवस्था झालेली नसून सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुस्थितीत सुरु आहेत.
(४) हे खरे नाही.
श्री.की.वा.खटावकर हे पालघर जिल्ह्याचे “जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी” म्हणून कार्यरत आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड-मालवणी (मुंबई) येथील महाकाली नगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(४) * १२२४४५ श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड-मालवणी (मुंबई) येथील महाकाली नगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकलपाच्या (एसआरए) कामाला १२ वर्षे उलटूनही तो पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्विकासापूर्वीच्या ५६१ घरांपैकी २२५ लोकांना घरे मिळाली परंतु उर्वरित ३३६ लोकांना अजूनही घरे मिळालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचप्रमाणे त्यातील १०० लोकांना चार वर्षांपासून मासिक भाडेही मिळालेले नसून या थकित भाड्याची रक्कम रुपये ३ कोटी ३० लाखांहून अधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे तेथील संतप्त रहिवाशांनी विकासकाने लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर योजनेला दि.०१.१२.२००९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे आशयपत्र प्रदान करण्यात आलेले असून सदर योजनेत एकूण ५१३ पात्र झोपडीधारक आहेत. त्यापैकी पुनर्वसन इमारत क्र.२ मध्ये २१७ निवासी, १७ अनिवासी पात्र झोपडीधारकांना दि.२०.०१.२०१७ रोजीच्या पूर्ण भोगवटा प्रमाणपत्रानुसार कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे. तसेच पुनर्वसन इमारत क्र.१ मध्ये एकूण २२० निवासी व २६ अनिवासी पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. पुनर्वसन इमारत क्र.३ मध्ये अनिवासी ४, निवासी २९ झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. सदर इमारतीचे काम चालू आहे.
(३), (४) व (५) हे खरे आहे.

सदर पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना भाडे मिळाले नसल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे ४१ सभासदांच्या तक्रारी दि.१४.०५.२०१८ रोजी प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी सर्व अर्जावर वेळोवेळी सुनावणी घेण्यात येऊन निर्णय दिलेला आहे. तसेच सदर निर्णयाचे विकासकाने पालन न केल्यामुळे योजनेच्या विकासकास विक्री घटकाच्या कामास स्थगिती देण्याचे आदेश दि.१५.०३.२०१८ व दि.१८.०५.२०१८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये टाकण्यात आलेला दरोडा

**(५) * १२१२६९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पडघा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये मौजे डोहाळे येथे दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास रात्री ९.०० वाजता दरोडा टाकण्यात आल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन या प्रकरणी गुन्हा दाखल करुन घ्यावा अशी मागणी करुनही लोकप्रतिनिधींना गुन्हा दाखल करुन घेण्याकरीता प्रतिक्षा करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोपीवर भा.दं.वि. कलम ३९५ अन्वये गुन्हा व अन्य गुन्हे दाखल असताना आरोपीस न्यायालयात हजर न करता सोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांच्यावर कार्यात कसूर केल्याप्रकरणी तसेच लोकप्रतिनिधी यांचा अवमान केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री व पोलीस अधिक्षक यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दरोडा टाकणा-या आरोपीवर तसेच गुन्हा दाखल करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे डोहाळे या गावी पूर्व वैमनस्यातून दोघाजणांमध्ये वाद होऊन दमदाटी करुन एकमेकांच्या सोन्याची चेन जबरीने खेचून चोरुन नेल्याच्या तक्रारीसंदर्भात प्राथमिक चौकशी करुन प्राप्त फिर्यादीनुसार पडघा पोलीस ठाणे

येथे गु.र.क्र. ११६/२०१८ भा.दं.वि. कलम ३९५, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह आणि गु.र.क्र. ११७/२०१८ भा.दं.वि. कलम ३९५, ३२३, ५०४, ५०६, ३४ असे परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सदर गुन्हयातील तक्रारदार हे एकमेंकाचे चूलत भाऊ असून परस्परांचे नातेवाईक आहेत त्यांच्यात असलेल्या जून्या भांडणावरून त्यांनी आपसांत परस्पर विरोधात सदरचे गुन्हे दाखल केल्याचे सकृत दर्शनी दिसत आहे. प्राथमिक तपास करुन तद्नंतर आरोपी यांना अटक करणे योग्य वाटल्याने दोन्ही गुन्हयातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात आलेली नाही. मात्र गु.र.क्र. ११६/२०१८ प्रकरणी आरोपीने दाखल केलेल्या अटक पूर्व अर्जास विरोध करुन मा. न्यायालयाने जामिन अर्ज नामंजूर केल्यानंतर आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, सदर प्राप्त अर्जाची चौकशी करण्यात आली असून, फिर्यादीने जबाबावर उशिरा सहया केल्या असल्याने सदर गुन्हा नोंदविल्यास विलंब झाला आहे. परंतु झालेला विलंब हा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे दिरंगाईमुळे झाल्याचे दिसून येत नसल्याबाबतचा चौकशी अहवाल उपविभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी यांनी सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भांडूप (मुंबई) येथील पिंपळेश्वर कॉलनीमधील सार्वजनिक शौचालय खचल्याने दोघांचा झालेला मृत्यू

**(६) * ११६६४० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (मुंबई) येथील पिंपळेश्वर कॉलनीमधील साई सदन चाळीतील सार्वजनिक शौचालय खचल्याने दोघांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा व मुंबई महानगरपालिकेमार्फत सन १९८० पासून बांधलेल्या शौचालयांपैकी ८० हजार शौचालये धोकादायक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देखभाल व दुरुस्तीच्या अभावामुळे तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे ही शौचालये जीर्ण होऊन धोकादायक अवस्थेत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीर्ण झालेल्या शौचालयांचे लेखापरीक्षण करून धोकादायक आढळलेल्या शौचालयांची पुनर्बांधणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) साई सदन चाळ, पिंपळेश्वर कॉलनी, भांडूप येथील खाजगी शौचालय दिनांक २८.०४.२०१८ रोजी कोसळल्याने दोन व्यक्तींचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

• सुस्थितीत असलेल्या शौचालयांची संयुक्त पाहणी करुन सदर शौचालये महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात यावीत.

• सदर शौचालयांमध्ये पाणी व वीज पुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपलब्ध करुन द्यावा व सदर शौचालयांची देखभाल स्वयंसेवी संस्था (सी.बी.ओ.) मार्फत करुन घेण्यात यावी.

• दुरुस्तीची आवश्यकता असणारी शौचालये म्हाडा प्रशासनाने स्वनिधीतून दुरुस्त करुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावीत. तद्नंतर महानगरपालिकेने सदर शौचालयांची देखभाल स्वयंसेवी संस्था (सी.बी.ओ.) मार्फत करुन घेण्यात यावी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांमार्फत परिरक्षण व दुरुस्ती करण्यात येते.

• जीर्ण झालेल्या शौचालयांची वेळोवेळी पुनर्बांधणी करण्यात येते.

• सन २०१७-१८ पासून शौचालयांच्या संरचनात्मक परिरक्षणासाठी विभाग कार्यालयांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत १६,७०३ शौचकुपांची पुनर्बांधणी व ६,०७१ शौचकुपांची नव्याने बांधणी करण्यासाठी निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील पथदिवे बसविण्याच्या कामात झालेली अनियमितता

**(७) * १२३४०७ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने शहरात नवे पथदिवे बसवून त्याची देखभाल दुरूस्तीसाठी रुपये ११४ कोटींचे कंत्राट एनर्जी एफिशियन्शी सर्विसेस या कंपनीला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटदार कंपनीने सहा महिन्यांपासून काम सुरू केले असून काही ठिकाणी पथदिवे बसविले आहेत व त्यांची दुरूस्ती व देखभाल ही कंपनीच करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून जुन्या २२ कंत्राटदार एजन्सीला निम्यापेक्षा जास्त पथदिवे बंद असूनही वारंवार नियमबाहय मुदतवाढ देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेने शहरात नवे पथदिवे बसवून त्यांची देखभाल दुरुस्तीबाबतचे कंत्राट एनर्जी इंफिशियन्सी सर्विसेस या कंपनीला दिलेले नसून, ते मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या कंपनीस रु.११२.२१ कोटी रक्कमेस दिलेले आहे, हे खरे आहे.

(२) मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या कंपनीने माहे एप्रिल, २०१८ पासून कामास सुरुवात केलेली असून,कंपनीने बसविलेल्या पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती सदर कंपनी करणार आहे.

(३) औरंगाबाद शहरातील जुन्या पथदिव्यांच्या देखभालीसाठी निविदा काढूनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे यापूर्वी नियुक्त २२ कामांसाठी कंत्राटदारांना नवीन पथदिवे बसवून होई पर्यंत सर्वसाधारणसभेच्या ठरावानुसार रीतसर वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मध्यवर्ती कारागृहातील अनेक कच्चे कैदी पोलीस मनुष्यबळ पुरेसे नसल्याने जामिन सुनावणी अभावी तुरुंगातच असल्याबाबत

**(८) * ११८४५१ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील येरवडा (पुणे), मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती येथील मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांपैकी ७३ टक्के कैद्यांची जामिनावर सुनावणी होत नसल्याने गत अनेक वर्षापासून ते तुरुंगात असल्याचे अलिकडेच केलेल्या पहाणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी बहुतेक कैदी हे किरकोळ प्रकरणातील असून त्यांना न्यायालयात हजर करण्यासाठी पोलीसांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने विहित केलेल्या मुदतीत न्यायालयात नेले जात नसल्यामुळे कच्च्या कैद्यांची जामिनावर सुनावणी होत नसून कैद्यांना तुरुंगात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ही बाब मा.न्यायालयाच्या कार्यकक्षेक्षी संबंधित आहे.
(२) येरवडा (पुणे), मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या कारागृहांत मागणीप्रमाणे १०० टक्के पोलीस पथकाचा पुरवठा पोलीस मुख्यालयाकडून होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु आतापर्यंत १,७०,७०९ बंद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्ही.सी) द्वारे मा.न्यायालयात हजर करण्यात आले आहे. तसेच जामीनावर सुनावणीसाठी न्यायालयात बंद्यांस प्रत्यक्ष हजर करणे आवश्यक नाही.
(३) मा.उच्च न्यायालय, जनहित याचिका क्र. ४६/२०१५ व १६७/२०१५ सह ९/२०१७ मध्ये दिनांक ०१.०३.२०१७ च्या आदेशानुसार राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त बंदी असल्याने कायद्यात्मक तरतूदी वा मा.सर्वोच्च न्यायालयाचे या संदर्भातील विविध न्यायालयीन निवाडयांच्या अनुषंगाने अभ्यास करुन न्यायाधीन बंद्यांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी मा. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश डॉ.एस.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ०६.०६.२०१७ अन्वये समिति गठित केली आहे. सदर समितीने दिनांक २६ जून२०१८ रोजी शासनास अहवाल सादर केली असून त्याची छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनगाव (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील कोतवाल व तलाठ्यास रेती माफियांद्वारे जिवे मारण्याचा केलेला प्रयत्न

**(९) * ११८९९४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सोनगाव (ता.चांदुर रेल्वे) येथील अवैध गौण खनिज वाहतुक तपासणी व नियंत्रण या मोहीमेत रेती वाहतुक चेकपोस्टवर नियमीतपणे रेतीच्या ट्रकची तपासणी करीत असतांना रेती ट्रक मालकाने एका कोतवालास तसेच तलाठ्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चेकपोस्टवर नियमितपणे सकाळी ६ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत तलाठी, कोतवाल व एका पोलीस कर्मचा-याची नियुक्ती करण्यासाठी तहसिलदारांनी ठाणेदार, चांदुर रेल्वे यांना लेखी निवेदन पत्र दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर गुंडगिरी करणाऱ्या रेतीमाफियावर कारवाई करण्याबाबत तसेच तालुक्यातील चेकपोस्टवर पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, सदरची धमकी ट्रक चालकाने दिलेली नसून दोन अज्ञात व्यक्तींनी दिली आहे.
(२) व (३) सदर घटनेच्या दिवशी सोनगांव चेक पोस्टवरील अवैध गौण खनिज वाहतूक तपासणी पथकासोबत पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथील पोलीस कर्मचारी नेमण्यात आला होता. तसेच ज्यावेळी सदर पथक कार्यवाहीसाठी बाहेर जाईल त्यावेळी त्यांचेसोबत पोलीस स्टेशनमधील पोलीस कर्मचारी देण्यात येईल असे लेखी पत्राद्वारे पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी तहसिलदार, चांदूर रेल्वे यांना कळविले आहे. उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथे अप क्र.१२६/२०१८, कलम ३५३, ५०४, ५०६, ३४ भादंवि अन्वये दोन अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यासह राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये पोलीस भरतीत मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार

**(१०) * ११६९८१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात ६९ पोलीस शिपायांच्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस शिपाई भरतीमध्ये उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेण्यासाठी एस.एस.जी. सॉफ्टवेअर या सांगली जिल्ह्यातील कंपनीला कंत्राट

देण्यात आले होते, तसेच परिक्षेस बसलेल्या उमेदवारांपैकी १३ विद्यार्थ्यांशी आर्थिक संगनमत करुन त्यांना ९० पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण केल्याचे प्रकरण नांदेडच्या जिल्हा पोलीस अधिक्षकांनी उघडकिस आणले असून या गैरव्यवहाराबाबत ४ कर्मचाऱ्यांसह २० जणांविरुध्द नांदेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी जबाबदार असलेल्या सॉफ्टवेअर कंपनीवर तसेच आर्थिक संगनमताने पास केलेल्या परिक्षार्थींवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(४) तसेच, राज्यात ४ ठिकाणी झालेल्या पोलीस शिपाई भरतीमध्ये हिच पध्दत अवलंबिण्यात आल्याच्या संशयामुळे जिल्हा पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी याबाबतचा अहवाल शासनास पाठविला असल्यामुळे त्या अनुषंगाने नांदेड व पुणे येथील पोलीस भरती परिक्षा रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नांदेड सह हिंगोली येथील एसआरपी व राज्यातील १७ जिल्हयांमध्ये पोलीस भरतीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असून, त्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असून, १७ जिल्हयातील भरती प्रक्रियेच्या सॉफ्टवेअरचे काम करणारी कंपनीच या गैरव्यवहाराची सूत्रधार असून, काही पोलीस अधिकारीही यामध्ये सहभागी असल्याची माहिती पोलीसांना मिळाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अश्या प्रकारच्या घटना रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. सदरहू गैरप्रकार पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आस्थापनेवरील सन २०१८ च्या पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणी/लेखी परीक्षेमध्ये झालेला नसून, लेखी परीक्षा झाल्यानंतर उमेदवारांच्या उत्तरपत्रिका स्कॅन करतांना १३ उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांबाबत गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी त्यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिका स्कॅन करतांना झालेल्या गैरप्रकाराबाबत २० आरोपींविरुध्द वजिराबाद पोलीस ठाणे येथे भाग-५, गु.र.क्र.९०/२०१८, कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२०-ब, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथके बनविण्यात आलेली असून अटक आरोपींचे मोबाईल फोन, लॅपटॉप जप्त करुन पुरावे संकलीत करुन अधिक तपास सुरु आहे.

(४) अंशत: खरे आहे. पोलीस शिपाई भरती-२०१८ च्या प्रक्रियेमध्ये सदरहू गैरप्रकार ४ घटकांमध्ये घडलेला नसून फक्त पोलीस अधीक्षक, नांदेड व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक २, पुणे या दोन घटकांमध्येच घडल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे दोन्ही घटकांमधील लेखी परीक्षा रद्द करुन, नव्याने लेखी परीक्षेचे आयोजन करुन त्याप्रमाणे दोन्ही घटकांनी निवडसूची प्रसिध्द केलेली आहे.

(५) अंशत: खरे आहे. पोलीस शिपाई भरती-२०१८ च्या प्रक्रियेमध्ये सदरहू प्रकार १७ पोलीस घटकांमध्ये घडलेला नसून फक्त पोलीस अधीक्षक, नांदेड व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक २, पुणे या दोन घटकांमध्येच घडल्याचे निष्पन्न झाले होते. पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेतील उत्तरपत्रिका स्कॅन करतांना गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर, तपासादरम्यान, मे.एस.एस.जी. सॉफ्टवेअर सोल्युशन, सांगली या कंपनीचे ओ.एम.आर.ऑपरेटर यांनी काही पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १२, हिंगोली यांच्या आस्थापनेवरील सन २०१३, २०१४ व २०१७ च्या पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत गैरप्रकार केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबतीत सदर गुन्हयात आतापर्यंत २ पोलीस कर्मचारी व कंपनीच्या ३ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे.

(६) व (७) होय हे खरे आहे. सदर प्रकरणी सन २०१३ च्या भरती प्रक्रियेत निवड झालेले ४, सन २०१४ च्या भरती प्रक्रियेत निवड झालेले ६, अशा एकूण २० पोलीस शिपाई व इतर ६ आरोपी, अशा एकूण २६ आरोपींविरुध्द

हिंगोली शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१९१/२०१८, कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व १२० (ब) भा.दं.वि. अन्वये दि.११/५/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वर नमुद २० पोलीस शिपायांना निलंबित केले असून प्राथमिक चौकशी सुरु आहे.

-----------------

## काळाचौकी (मुंबई) येथे झोपडपट्टी पुनर्विकासाचे काम करतांना विकासकाने पापकोटेश्वर मंदिर जमिनदोस्त केल्याबाबत

**(११) * ११८८५६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत डोंगर पायथ्यापासून १०० फूटाच्या आत बांधकाम करण्यास मनाई असतानाही काळाचौकी येथील डोंगरापासून १० फूटावर वसलेल्या जिजामातानगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत पुनर्विकासाचे काम करतांना सिरोया बिल्डर आणि डेव्हलपर्स या विकासकाने सन १९८० पासून असलेले पापकोटेश्वर मंदिर जमिनदोस्त करुन तसेच बेकायदेशिररित्या झाडे तोडून जमीन हडप केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगरपायथ्याशी असलेल्या या धोकादायक बांधकाम व पुनर्विकासात मंदिर क्षेत्रफळाची जागा हडप केल्याप्रकरणी पापकोटेश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्टने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई शहर, विभागीय आयुक्त, एफ साऊथ आदिंकडे माहे मार्च, २०१८ मध्ये व तत्पूर्वी लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

डोंगर पायथ्यापासून १०० फुटाच्या आत बांधकाम करण्यास मनाई असल्याचा शासन निर्णय दि.१४.११.२०१७ रोजीचा आहे. तथापि, जिजाऊ प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत त्यापूर्वीच मंजूरी देण्यात आलेली आहे.

पापकोटेश्वर मंदिर जमिनोदस्त करण्यात आले नसून, मंदिर जागेवर आहे त्या स्थितीत असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) हे खरे आहे.

पापकोटेश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट यांनी शहर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता.

(३) पापकोटेश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट नोंदणीकृत ट्रस्ट असून या ट्रस्टचे एक ट्रस्टी श्री.अशोक देवरुखकर यांनी पापकोटेश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीची स्वत:ची मालमत्ता नाही असे अंडरटेकींग धर्मादाय आयुक्त यांना न्यायालयीन प्रकरणात दिलेले आहे. यास्तव न्यायालयाने दि.१९.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये पापकोटेश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्टचा दावा फेटाळला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत पाणी मिटर खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ११७०३१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत नालेसफाई व रस्ते गैरव्यवहारानंतर आता पाणी मिटर खरेदीत रुपये २०० कोटींहून अधिक गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २००९ मध्ये पाण्याचे जुने मीटर बदलून वेगवेगळ्या गेजचे १ लाख ३५ हजार स्वयंचलित रिडींग मीटर

खरेदी करण्याचा निर्णय घेवून शहर विभागातील मीटर पुरविण्यासाठी प्रतिभा इंडस्ट्रिज, पश्चिम उपनगरासाठी एक्सलिया युनिटी जेव्ही व पूर्व उपनगरासाठी जेव्ही युनीटी एक्सलिया या कंपन्यांची नियुक्ती करण्यात येवून त्यासाठी रुपये ३१६ कोटींचे कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तीनही कंपन्यांना मीटर बसविण्यासह त्याची ५ वर्षांपर्यंतची देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती व या कंपन्यांनी सुमारे ३३ हजार ९७७ मीटरचा पुरवठा केला असून मीटर खरेदीकरीता कंपन्यांना रुपये २६७ कोटी आगावू रक्कम देण्यात आली असतानाही जूने मीटर काढून नवे मीटर बसविणे अपेक्षित होते, मात्र हे मीटर न बसविल्यामुळे महानगरपालिकेला सुमारे रुपये ५२ कोटींचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रुपये २०० कोटींच्या गैरव्यवहारामध्ये महानगरपालिकेचे १३ अभियंते दोषी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगरपालिकेमध्ये जलजोडण्यांवर जलमापके स्थापित करण्याच्या कामामध्ये अनियमितता झाल्याचे लोकलेखा समितीच्या अहवालामध्ये निदर्शनास आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) मुंबई शहर, पूर्व व पश्चिम उपनगर या तीन विभागाकरीता अनुक्रमे प्रतिभा इंडस्ट्रीज, एक्सेलिया युनिटी जेव्ही व युनिटी एक्सेलिया जेव्ही या कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर मीटर खरेदीकरीता आगाऊ रक्कम देण्यात आलेली नाही.

कंत्राटातील अटीनुसार जलमापकांचा पुरवठा झाल्यानंतर ७० टक्के रक्कम व त्यापैकी बसविण्यात आलेल्या जलमापकांची उर्वरित ३० टक्के रक्कम अशी एकूण रु. २६७.४५ कोटी रक्कम महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पांतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या एकूण १,२९,७७५ जलमापकांपैकी ९४,९२२ इतकी जलमापके कंत्राट कालावधीमध्ये बसविण्यात आली असून कंत्राट कालावधी संपल्यानंतर ३४,८५३ जलमापके गोडऊनमध्ये शिल्लक राहिली ही वस्तुस्थिती आहे.

८,१२० जलमापके गरजेनुसार महानगरपालिकेच्या विविध विभागात बसविण्यात आली आहेत. ४६३ जलमापके गोडऊनमध्ये आढळून न आल्याने व ५३६ जलमापके नादुरुस्त आढळल्याने एकूण ९९९ जलमापकांच्या खरेदी किंमतीची वसूली कंत्राटदारामार्फत करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत २५,७३४ जलमापके गोडाऊनमध्ये सुस्थितीत शिल्लक असून आवश्यकतेनुसार जलजोडण्यांवर बसविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४), (५) व (६) गोडाऊनमध्ये शिल्लक राहिलेल्या जलमापकांच्या अनुषंगाने १३ अभियंत्यांविरुध्द महानगरपालिकेच्या प्रमुख चौकशी अधिकारी यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## गोरेगांव (प) (मुंबई) सिध्दार्थ नगरमधील पत्रा चाळ पुनर्विकासातील गैरव्यवहार

**(१३) * ११७४८९ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (प) (मुंबई) सिध्दार्थ नगरमधील पत्रा चाळ पुनर्विकासाच्या नावाखाली गुरू आशिष कन्स्ट्रक्शन प्रा.लि., या विकासकाची नियुक्ती करून कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचा ठपका असून यासंदर्भात मुळ करारनाम्यात सुधारणा करून विकासकाचा मोठा फायदा करून देणा-या म्हाडाच्या संबधित अधिका-यांची चौकशी करण्यासाठी माजी मुख्य सचिव

श्री.जॉनी जोसेफ यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियुक्ती केलेल्या समितीने चौकशी करुन सदरील अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरील अहवालाच्या अनुषंगाने पत्राचाळ पुनर्विकास गैरव्यवहारातील म्हाडा अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदरहू समितीने अद्यापपर्यंत अहवाल शासनास सादर केलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवई, साकीविहार (मुंबई उपनगर) येथील उच्चभ्रू वसाहतीतील घरात सशस्त्र दरोडा टाकण्यात आल्याबाबत

**(१४) * ११६९५४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवई, साकीविहार (मुंबई उपनगर) येथील उच्चभ्रू वसाहतीतील एका बड्या कंपनीत व्यवस्थापक आणि नामांकित शाळेच्या विश्वस्त असलेल्या महिलेच्या घरात सशस्त्र दरोडा टाकून सुमारे रुपये साडेचौदा लाखांचा ऐवज लुटल्याची घटना घडल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पवई पोलीसांनी गुन्हा दाखल करुन त्याचा तपास सुरु केला आहे काय,

(३) असल्यास, तपासात काय आढळून आले व तद्नुसार आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०४/२०१८ भा.दं.वि. कलम ३९२, ३४१, ४५२, ५०६ (२), ३४ सह कलम ३ व २५ शस्त्र अधिनियम, १९५९ अन्वये गुन्हादाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर, बोईसर परिसरात स्वस्तात घरे देण्याचे अमिष दाखवून गुंतवणुकदारांची करण्यात आलेली फसवणूक

**(१५) * ११७०१६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर, बोईसर परिसरात स्वस्तात घरे देतो या आमिषावर मुंबईतल्या सुमारे ४०० गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत भायखळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हाही नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदरहू प्रकरणी भायखळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६३/१८ कलम ४२०, ३४ भा.दं.वि. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यामध्ये एकूण तीन आरोपी असून त्यापैकी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच, सदर गुन्ह्यातील आरोपी यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे.

सदरचा गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विलपार्ले (मुंबई) परिसरातील नऊ तरुणांनी एका अल्पवयीन विद्यार्थीनीवर केलेला लैंगिक अत्याचार

**(१६) * १२२८३५ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलपार्ले (मुंबई) परिसरातील नऊ तरुणांनी एका अल्पवयीन विद्यार्थीनीची चोरुन काढलेली अश्लील चित्रफीत पसरवू (व्हायरल करु) अशी धमकी देत सुमारे वर्षभर लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलेपार्ले पोलीसांनी यापैकी सहा तरुणांना दिनांक ४ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली असून अटक आरोपीमध्ये एका माजी नगरसेविकेच्या मुलाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ४४/२०१८ भा.दं.वि. कलम ३७६, ३७६(आय), ३७६(न), ३७७, ३५४, ३५४(ड), ५११, ५०९, ५०६, ५०४, ३४ भादविसह ४,८,१२,१७,१८ लहान मुलाचे लैंगिक शोषण संरक्षण कायदा -२०१२

सह कलम ६६ (ई), ६७ (ब), आय.टी ॲक्ट अन्वये नऊ आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यापैकी आठ आरोपी अटकेत आहे. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून त्यांचेविरूध्द मा.सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे दोषारोप दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथे २४७ धोकादायक इमारती व ३० अतिधोकादायक इमारती असल्याबाबत

**(१७) * १२२०७१ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील धोकादायक इमारती २४७ व अतिधोकादायक इमारती ३० असल्याचे स्थानिक प्रशासनाने घोषित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही अतिधोकादायक इमारतींवर स्थानिक प्रशासनाने निष्कासनाची कार्यवाही केलेली असून सदर धोकादायक व अतिधोकादायक इमारतीच्या रहिवाश्यांच्या जीवाला धोका असल्याने सदर इमारतीचे पुनर्निमाण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडे ४ चटई क्षेत्र निर्देशांक मिळण्यासाठीचा प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०१२ पासून शासनाकडे पडून असल्याचे स्थानिक प्रशासनाच्या दिनांक २१ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी धोकादायक इमारतीच्या प्रश्नावर कोणताही निर्णय शासनाकडून घेतला जात नसल्याचे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात २५२ धोकादायक व १९ अतिधोकादायक इमारती असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार, नियमाधीन होणाऱ्या बांधकामांच्या पुनर्विकासासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबत अधिनियमात सुधारणा करण्याचा ठराव पारित करुन तो शासनाकडे पाठविला आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरित महानगरपालिका क्षेत्रासाठी एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याचा निर्णय घेऊन सदरची नियमावली कलम ३७(१कक) मधील तरतुदीनुसार आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द केली आहे.

सदर नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समूह विकास योजनेची नियमावली अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये ३० वर्षे जुन्या अधिकृत/अनधिकृत इमारतींचा समावेश आहे. सदरची नियमावली मंजूर झाल्यानंतर ती उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी सुध्दा लागू होईल.

-----------------

## मालाड (पूर्व) (मुंबई उपनगर) येथील पोईसर नदीच्या पात्रातील ५४२ झोपडीधारकांचे एसआरए योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याबाबत

**(१८) * ११६७२३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड (पूर्व) (मुंबई उपनगर) दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील पोईसर नदीच्या मार्गातील दुर्गानगर, आनंदनगर, शांतीनगर आणि आप्पापाडा या परिसरातील नदीपात्राच्या रुंदीकरणाच्या विकास कामात बाधित होत असलेल्या ५४२ झोपड्यांचे एसआरए योजनेंतर्गत पुनर्वसन करण्यासंदर्भात एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात दिनांक ०९ एप्रिल, २०१८ रोजीच्या सुमारास संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत ५४२ बाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत, प्राधिकरणाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यानुसार सदरहू झोपडीधारकांचे एसआरए योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासन तथा प्राधिकरणातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सदरहू नदीपात्रातील बाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी करण्यात येत असलेल्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व किती कालावधीत सदर कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मालाड (पूर्व) येथील पोईसर नदी लगतच्या बाधीत झोपडीधारकांचे पुनर्वसनाबाबत जे झोपडीधारक मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये समाविष्ट असतील त्यांचे पुनर्वसन, योजनेद्वारे करण्याचे प्रस्तावित आहे.

मात्र इतर बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन बृहन्मुंबई महानगरपालिकेने करण्याचे अभिप्रेत आहे.
(३) नदीपात्रातील बाधित न.भू.क्र. १९ अ आणि २५ अ वर गोकुळदुर्गा नगर सह.गृह. संस्था ही योजना स्विकृत असून दि. ०८.११.२०१६ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांना प्रथम आशयपत्र प्रदान केले आहे. सदर योजनेच्या विकासकास बाधित झोपडीधारकांचे तात्पुरते पुनर्वसन करण्याकरीता दि.०९.०५.२०१८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे कळविण्यात आले आहे. सदर बाबत योजनेच्या विकासकाने संबंधित झोपडीधारकांना तात्पुरत्या निवासाकरीता भाडे देवून अन्यत्र स्थलांतरित होण्याकरीता प्रस्ताव दिला असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये अल्पवयीन मुली हरवण्याचे व अपहरणाचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१९) * ११७४१४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गत पाच वर्षात अल्पवयीन मुली हरवण्याचे व अपहरणाचे प्रमाण एकुण १५ पटीने वाढल्याची गंभीर माहिती माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सन २०१३ साली अपहरण आणि हरवलेल्या मुलींची संख्या ९२ इतकी होती ती २०१७ साली १५ पटीने वाढून १३६८ पर्यंत पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सन २०१३ ते २०१७ या कालावधीत ५०५६ मुलींचे अपहरण झालेले असून त्यातील ३७० मुली अद्याप बेपत्ता असल्याचे समजते तर सदर कालावधीत हरवलेल्या एकूण २८३९ स्त्रियांपैकी ५३० स्त्रिया अद्याप मिळाल्या नसल्याचे माहिती अधिकारांतर्गत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अल्पवयीन बेपत्ता होणा-या मुलींचा शोध घेण्यास पोलीस यंत्रणा अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलांचा/मुलींचा वापर समाजकंटकांकडून अनैतिक कृत्यासाठी व भीक मागण्यासाठी केला जाण्याची शक्यता असल्याने या मुलांचा/मुलींचा तातडीने तपास करुन अपहरणकर्त्यांस कडक शासन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातून अपहरण/हरवलेल्या मुली व हरवलेल्या महिलांबाबत सन २०१३ ते २०१७ या कालावधीतील वर्षनिहाय सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| सन | १८ वर्षाखालील मुली | | १८ वर्षावरील महिला | |
|---|---|---|---|---|
| | अपहरण/ हरवलेल्या | सापडलेल्या | हरवलेल्या | सापडलेल्या |
| २०१३ | ९२ | ७९ | ४०४१ | ३८२३ |
| २०१४ | १५०० | १४७५ | ४१७० | ३९४३ |
| २०१५ | ९२७ | ८७८ | ४३१५ | ४०३९ |
| २०१६ | ११६९ | १०९१ | ४५२७ | ४०९६ |
| २०१७ | १३६८ | १२३५ | ४५९९ | ३७८५ |
| एकूण | ५०५६ | ४७५८ | २१६५२ | १९६८६ |

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२ “बचपन बचाव आंदोलन” संदर्भात दिनांक १० मे, २०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांचे बाबतीत उपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. त्यामुळे यामध्ये वाढ दिसून येत आहे.
(४) हे खरे नाही. अपहरण/हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यासाठी बृहन्मुंबई पोलींसाकडुन सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात. यामुळे बहुतांश अपहरण/ हरवलेल्या मुली सापडून आलेल्या आहेत.

(५) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस ठाण्यात सन २०१३ ते २०१७ या कालावधीत १८ वर्षाखालील मुला/मुलींचे भीक मागण्यास लावण्यासाठी अपहरण केल्याबाबत एकूण ३ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी दोन गुन्ह्यात दोषसिध्दी झाली असुन एका गुन्ह्यात आरोपीस दोषमुक्त करण्यात आले आहे.

तसेच, या कालावधीत अपहरण केलेल्या १८ वर्षाखालील मुलींचा अनैतिक कृत्यासाठी वापर केलेबाबत बृहन्मुंबईतील पोलीस ठाण्यात एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी १० गुन्हे न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडबाबत

**(२०) * ११७५०३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडला वारंवार लागणा-या आगीमुळे स्थानिक नागरिकांना श्वसनाचा आजार व डोळ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेवर स्थानिक नागरिकांनी कल्याण डम्पिंग ग्राऊंड हटाव मोर्चा माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण डम्पिंग ग्राउंडला वारंवार आग लागण्याचे सत्र सुरु असून येथील डम्पिंग ग्राउंड हटवून परिसरात जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी शहरात ठिकठिकाणी बायोगॅस प्रकल्प उभारण्याची योजना आखण्यात आली होती तथापि ती कागदोपत्रीच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचरा निवारणासाठी १३ बायोगॅस प्रकल्प उभारण्याचे नियोजन असूनही त्यापैकी दोन प्रकल्प उभारले आहेत मात्र अन्य प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • दि. १०.०३.२०१८ रोजी कल्याण येथील डम्पिंग ग्राऊंडला आग लागली होती. सदर आगीच्या धुराच्या त्रासामुळे नागरिकांनी महापालिकेवर दि.१०.०३.२०१८ रोजी मुकमोर्चा काढला, ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वच्छ भारत अभियानअंतर्गत रू. ११४.२३ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त झाली आहे. त्याअंतर्गत घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी १३ ठिकाणी बायोगॅस प्रकल्प व ३ ठिकाणी एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व शास्त्रोक्त भराव भूमी उभारण्याचे प्रकल्प प्रस्तावित केले होते.
• त्यापैकी मौजे उंबर्डे, कल्याण (प.) व आयरे, डोंबिवली (पू.) येथील १० मे. टन क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित झालेले असून मौजे कचोरे, बारावे व राजूनगर येथील प्रत्येकी १० मे. टन क्षमतेच्या प्रकल्पाची कामे सुरू आहेत.
• ओल्या कचऱ्याचे वर्गीकृत प्रमाण वाढल्यानंतर उर्वरित ८ ठिकाणी बायोगॅस प्रकल्प जागा उपलब्धतेनुसार हाती घेणे प्रस्तावित आहेत.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील कचरा डेपोकरीता आरक्षित असलेल्या मौजे उंबर्डे येथील आरक्षण क्र. ४५ मधील १३.४४ हेक्टर, मौजे बारावे येथील आरक्षण क्र. १५० मधील ३.०० हेक्टर व मौजे माडा येथील आरक्षण क्र. १ मधील १०.३९ हेक्टर भूखंडावर शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्प उभारणेकरीता एप्रिल, २०१७ मध्ये निविदा अंतिम करण्यात येवून कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.
• मौजे उंबर्डे व बारावे येथील प्रकल्पास पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला दि. ०६.०६.२०१८ रोजी प्राप्त झाला असून, सदर प्रकल्प मार्च, २०१९ पूर्ण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

• मौजे उंबर्डे व बारावे येथील प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर आधारवाडी येथील डम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्तरित्या कायमस्वरूपी बंद करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे व खडपोली औद्‌योगिक वसाहतीतील (जि.रत्नागिरी) कारखान्यात झालेल्या अपघातात जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(२१) * ११७०९७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्‌योगिक वसाहतीतील कृष्णा ॲन्टीऑक्सिडंट या रासायनिक कारखान्यामध्ये रसायन अंगावर पडून ३ कामगार गंभीररित्या जखमी झाले असल्याची घटना दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यामध्ये ज्वलनशील पदार्थांचे उत्पादन घेतले जात असताना आणि कारखान्यापासून जवळच आवाशी व लोटे या गावची लोकवस्ती तसेच अवघ्या पाचशे मीटर अंतरावर पेट्रोलपंप असताना कारखान्यामध्ये सुरक्षिततेची अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्याचे मुख्य युनिट हे गाणे-खडपोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) औद्‌योगिक वसाहतीमध्ये असून या ठिकाणी दिनांक २ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्फोट झाल्यामुळे या परिसरातील लोकांवर स्थलांतरित होण्याची वेळ आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, खडपोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) औद्‌योगिक वसाहतीतील कृष्णा एन्टी ऑक्साईड प्रा.लि. या कंपनीमध्ये अडीच महिन्यांपूर्वी घडलेल्या

भीषण आगीच्या घटनेप्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व आरोग्य संचालनालय यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सादर केलेल्या अहवालात शेरे मारले असून अपघातग्रस्त प्लान्टमध्ये उत्पादनास अथवा रसायन साठविण्यास कोणतीही परवानगी दिलेली नसल्याचे उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर कारखान्यातील भोगवटादारावर दिनांक ०२/०३/२०१८ रोजीच्या घटनेच्या संदर्भात महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ चा नियम ४(३) चा भंग आढळल्यामुळे मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांच्या न्यायालयात खटला क्र.५२५/२०१८ दिनांक २२/०५/२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक १८/०५/२०१८ रोजीच्या घटनेमध्ये कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७-अे(२)(अे) चा भंग आढळला असून मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांच्या न्यायालयात भोगवटादाराविरुध्द खटला क्र. ७५७/२०१८ दिनांक २८/०६/२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे.

या रासायनिक कारखान्यामध्ये गरम ऑईल व वाफ कामगारांच्या अंगावर उडुन तीन कामगार भाजून जखमी झाले. सदर कामगारांना उपचारानंतर दिनांक १९/०५/२०१८, २२/०५/२०१८, २६/०५/२०१८ रोजी घरी जाण्यास परवानगी देण्यात आली आहे. या अपघातामध्ये जखमी कामगारांना कोणतेही अपंगत्व आले नसल्यामुळे त्यांना कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. औषधोपचाराचा संपुर्ण खर्च कारखाना व्यवस्थापनाने केला आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागातील गैरव्यवहाराचा तपास मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडून संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(२२) * १२०४८१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबईच्या प्रेसीन्डेसी डिव्हीजनमधील रूपये ११२ कोटी ५८ लक्ष इतक्या निधीच्या गैरव्यवहाराचा तपास मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत मागील सहा वर्षापासुन सुरू असल्याबाबतची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतुन आमदार निवास, हायकोर्ट, आयएएस-आयपीएसची निवासस्थानांची विविध २४३४ कामे धनादेशावर चुकीचे बीडीएस टाकुन वटविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरव्यवहाराच्या चौकशीचा तपास मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला असुन त्याचा तपास मोहीम संथ गतीने सुरू असल्यामुळे त्यात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून सुध्दा त्यांच्यावर अद्यापपावेतो कारवाई  झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गैरव्यवहाराचा तपास करणा-या मुंबई आर्थिक गुन्हे शाखेच्या तपास मोहीमेला गती देण्याकरीता तसेच सदर गैरव्यवहारातील दोषी अधिका-यांवर कडक कारवाई करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही  करण्यात आली  वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदर प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरुन आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. १०४/१२ (आझाद मैदान पोलीस ठाणे गु.र.क्र. १८१/२०१२) भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ३४ अन्वये दोन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हा तपासाधीन आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई इलाखा शहर विभाग, मुंबई येथील विविध सरकारी आस्थापनाच्या इमारतीच्या दुरुस्ती व नुतनीकरण कामाचे

२४३४ कामे एकूण रु. ११२.५८ कोटी रक्कमेची ही मंजुर अनुदान नसताना तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी एकाच प्राधिकार पत्राचा क्रमांक दर्शवून धनादेश वटविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) नमुद गुन्ह्यातील २४३४ कामाची पडताळणी करण्याकरिता शासनाने रु.११२.५८ कोटी इतक्या खर्चाच्या वित्तीय विवरण पत्राच्या संदर्भात अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना संबंधित विभागाकडुन कामाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उपरोक्त कामांपैकी ४८३ कामाची तपासणी करण्यात आली असुन उर्वरित १९५१ कामाची पडताळणी करण्याकरिता मुख्य अभियंता मुंबई यांनी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना कळविले आहे.

सदर घोटाळ्यातील दोषी अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून ती प्रगतीपथावर आहे.

नमुद गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे उसळलेली दंगल

**(२३) * ११६५९०  श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.छगन भुजबळ (येवला), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील मोतीकारंजा, आंगुरीबाग, शहागंज, नवाबपूरा, राजाबाजार जिन्सी, क्रांती चौक या भागात दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास  किरकोळ कारणावरुन दंगल होऊन, शेकडो दुकानांना आगी

लावून मोठ्या प्रमाणात जाळपोळ करण्यात आली असून, यामध्ये अनेक जण जखमी होऊन त्यात दोन व्यक्तींचा मृत्यु झाला तसेच कोट्यवधी रूपयांची वित्त हानी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किरकोळ भांडणावरुन औरंगाबाद शहरात दंगल होण्याची शक्यता असल्याचा अहवाल गुप्तचर विभागाने माहे मार्च, २०१८ वा त्या दरम्यान दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस घटनास्थळी ऊशीरा पोहचल्याची माहिती महाराष्ट्राचे अप्पर पोलीस महासंचालक श्री.बिपीन बिहारी यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दंगलीत सहभागी झालेल्या पोलीस व राजकीय नेते/कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाईची मागणी लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक व धार्मिक संघटनांचे पदाधिकारी, जागरूक नागरिक यांनी लेखी स्वरूपात माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह, शहरे) तसेच जिल्हाधिकारी (औरंगाबाद), पोलीस आयुक्त (औरंगबाद शहर) यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दंगलीस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच दंगलीमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांचा नातेवाईकांना व जखमींना आणि दंगलीमधील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे
(२) व (३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर दंगलीच्या अनुषंगाने तपास सुरु आहे. दंगलीत सहभागी असलेले व ओळख पटलेले तसेच त्यांच्या विरुध्द पुरावा प्राप्त झालेल्या एकूण ६९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील सहभागी असलेल्या आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक करण्यात येत आहे. दंगलीसंदर्भात एकूण १६ दखलपात्र गुन्हे व १ अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दंगलीमध्ये झालेल्या जाळपोळीचे नुकसान व याबाबत चौकशी सुरु असून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींबाबत

**(२४) * ११६९६४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा, कळवा, नौपाडा, वागळे इस्टेट, कोपरी इ. भागातील सुमारे ४७०४ इमारती धोकादायक, ९५ इमारती अतिधोकादायक असल्याची माहिती महानगरपालिकेने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या सर्व्हेक्षणातुन निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महानगरपालिकेने वर्तकनगर प्रभागातील धोकादायक ७२ इमारतींची यादी जाहीर केली असून त्यामध्ये पोलीस वसाहतींमधील ५ तर म्हाडा वसाहतींमधील १७ इमारतींचा समावेश असल्याचेही माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धोकादायक इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू धोकादायक इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात सन २०१८ मध्ये एकूण ७२ इमारती धोकादायक आढळुन आलेल्या असुन त्यामध्ये ७ इमारती ह्या पोलीस वसाहतीच्या असुन म्हाडाच्या १६ इमारतींचा समावेश आहे.

पोलीस वसाहतीच्या ७ इमारतींपैकी ४ इमारती या सी-१ प्रवर्गातील असुन त्या रिकाम्या करण्यात आलेल्या आहेत. म्हाडाच्या १६ इमारती या सी-१ प्रवर्गातील असुन सदर इमारती रिकाम्या करण्यात आलेल्या आहेत.

(३) ठाणे महानगरपालिकने धोकादायक इमारतीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

- पोलीस वसाहतीच्या ७ इमारतींपैकी ४ इमारती रिक्त करण्यात आल्या असुन त्या तोडणे आवश्यक असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने नमुद केली आहे.
- उर्वरित ३ इमारती या सी-२ ए प्रवर्गातील असुन सदर इमारती रिक्त करुन दुरूस्ती करणेबाबत पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- म्हाडाच्या सी-१ प्रवर्गातील १६ इमारती रिक्त करण्यात आल्या असून पुनर्विकासासाठी विकासकाच्या ताब्यात आहेत. उक्त इमारती तोडण्याबाबत ठाणे महानगरपालिकेने म्हाडा व विकासकास कळविलेले आहे.

(४) वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील सी-१ प्रवर्गातील २६ इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## तोरणे (ता.वाडा, जि.पालघर) या गावातील इस्पात या कारखान्यात झालेला स्फोट

**(२५) * १२३६११ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोरणे (ता.वाडा, जि.पालघर) या गावातील इस्पात लोखंड निर्मिती कारखान्यात दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्फोट होऊन ४ कामगार मृत्यू होऊन काही कामगार जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्फोटाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच सदरहु स्फोटात मृत झालेल्यांच्या कुटुंबीयांना व जखमींना कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय हे खरे आहे.
(२) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाकडून या अपघाताची सखोल चौकशी करण्यात आली. सदर अपघातापूर्वी इंडक्शन फर्नेसला नव्याने रॅमिंग मासचे पॅचवर्क करण्यात आले होते. सदर रॅमिंग मास इंडक्शन फर्नेसला बसविण्याची पध्दत सुरक्षित व योग्य नसल्याने रॅमिंग मास इंडक्शन फर्नेस चालू असताना पडले. गरम धातुचा रस तेथील कॉपर कॉईलच्या संपर्कात आल्यामुळे कॉपर कॉईल फुटली व त्यामधील पाणी फर्नेस मधील गरम धातुच्या रसाच्या संपर्कात आले. त्यामुळे इंडक्शन फर्नेस मध्ये स्फोट झाला व त्यातील वितळलेला गरम धातुचा रस बाहेर आला. तो रस तेथे काम

करीत असलेल्या ४ कामगारांच्या अंगावर पडला. त्यामुळे तेथे काम करीत असलेल्या ४ कामगारांचा भाजून मृत्यु झाला. सदर इंडक्शन फर्नेसला रॅमिंग मास बसविण्याची पध्दत सुरक्षित व योग्य नसल्याने तसेच इंडक्शन फर्नेस चालवितांना कामगारांच्या सुरक्षेच्या व आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली खबरदारी न घेतल्यामुळे कारखान्याच्या भोगवटादारावर कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७(a) (२) (a) च्या भंगाबाबत फौजदारी खटला क्र. ४८९९/ २०१८, दिनांक २१/०६/२०१८ रोजी न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर स्फोटात मृत झालेल्या चार कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी रक्कम रु. २,२५,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२६) * १२२८८८ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील उजनी धरण आणि टाकळी बंधा-यात पुरेसा पाणीसाठा असतानाही सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळ्यात २५ टक्के जादा पाणी लागत असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विस्कळीत पाणीपुरवठ्याचा निषेध करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी संबंधित महानगरपालिकेसमोर निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथे पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • सोलापूर शहराची सध्याची लोकसंख्या ११ लक्ष इतकी असून सध्या शहराची पाण्याची गरज प्रतिदिन १८० एमएलडी इतकी आहे.

• सध्या शहरास एकरुख तलाव, भीमा नदी (टाकळी) व उजनी जलाशय या ३ उद्भवावरुन प्रतिदिन १५४-१५५ एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येतो.

• त्यापैकी एकरुख व टाकळी या उद्भवातील पाणीसाठ्यात घट झाल्याने तसेच सदरच्या योजना जुन्या झाल्याने व त्या पूर्ण क्षमतेने चालू शकत नसल्याने शहराचा पाणीपुरवठा काही कालावधीकरिता चार दिवसाआड करण्यात येत होता, हे खरे आहे.

• तथापि, सध्या शहरास तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) • उन्हाळ्यामध्ये पाण्याच्या जादा मागणीमुळे नागरिकांना काही प्रमाणात पिण्याच्या पाण्यासाठी त्रास होत होता, ही वस्तुस्थिती आहे.

(३) • या संदर्भात महानगरपालिकेच्या काही सदस्यांनी मे, २०१८ मध्ये महानगरपालिकेसमोर निदर्शने केली होती, हे खरे आहे.

(४) • सोलापूर शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या एकरुख तलाव, भीमा नदी (टाकळी) या योजनांचे पुनर्जीवन करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रु. ७१.६४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून सदर प्रकल्पाचे काम डिसेंबर, २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

• याव्यतिरिक्त सोलापूर शहरास भविष्यातील ३० वर्षाची गरज विचारात घेऊन शहरास उजनी जलाशयातून ११० एमएलडी वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या रु. ४३९ कोटी किंमतीच्या प्रकल्पास शासनाने मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सायन रुग्णालयातील एका डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्याचा झालेला मृत्यु

**(२७) * १२१३७९ श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन रुग्णालयातील एका डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने १९ वर्षीय कु.तेजस संजय खरे या अभियांत्रिकी कॉलेजच्या विद्यार्थ्याला आपले प्राण गमवावे लागल्याची गंभीर घटना माहे मे, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत दोषी डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सायन रुग्णालयात दिनांक २६.०५.२०१८ रोजी तेजस खरे या रुग्णाचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.
(३) सदर प्रकरणी संबंधित डॉक्टरला दिनांक ०१.०६.२०१८ पासून सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत के.ई.एम. रुग्णालयाच्या औषधवैद्यक शास्त्र विभागातील प्राध्यापक व खातेप्रमुख व जे.जे. रुग्णालयाच्या श्वसनक्रियाशास्त्र विभागातील प्राध्यापक व खातेप्रमुख यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील वाढलेल्या गुन्हेगारीबाबत

**(२८) * ११९२३५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात दिनांक १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीत सुमारे ३५८ विनयभंगाच्या, ५६ लैंगिक अत्याचाराच्या तसेच चोरी व दरोड्याच्या घटना घडल्या असून जिल्ह्यातील गुन्हेगारीचा आलेख वाढल्याची गंभीर बाब दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे महिलांच्या व नागरिकांच्या सुरक्षीततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार बुलढाणा जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बुलढाणा जिल्हयात दिनांक १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत या एका वर्षाच्या कालावधीत घडलेल्या विनयभंग, लैगिंक अत्याचार, चोरी व दरोड्याच्या घटनांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च २०१७ च्या तुलनेत सर्वच गुन्हयात वाढ दिसून येत नाही. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| गुन्हयाचा प्रकार | दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च २०१७ | दिनांक १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च २०१८ | फरक |
|---|---|---|---|
| बलात्कार | ६६ | ५६ | -१० |
| विनयभंग | २७८ | ३५८ | ८० |
| दरोडा | १५ | ७ | -०८ |
| जबरी चोरी | ४९ | ३९ | -१० |
| चोरी | ५९६ | ७१६ | १२० |

गुन्हेगारी रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

१. महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे रोखण्यासाठी महिलांच्या मदतीसाठी १०९१ या टोल फ्री क्रमांकाची सेवा सुरु करण्यात आली आहे.

२. महिलांच्या सुरक्षेसाठी व्हाटसअप नंबर ९४२२८८०११३ तसेच मोबाईल नंबर ८६९८००००११ हे सुरु करण्यात आले आहे.

३. छेडछाडीच्या प्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीने चिडीमार पथक, दक्षता पथक, पोलीस मित्र यांची मदत घेण्यात येते.

४. महिलांच्या सुरक्षेसाठी गर्दीच्या ठिकाणी, शिकवणी, वर्ग शाळा, महाविद्यालये, बाजारपेठ, धार्मिक स्थळे येथे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत.

५. जिल्हयातील प्रत्येक शाळा, महाविद्यालये, क्लासेसला जाऊन तसेच झोपडपट्टी भागामध्ये महिला व मुलीकरीता प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातात. त्यामध्ये लैंगिक अत्याचार / छेडछाडीचे विरोधात जागृती व्हावी व विद्यार्थीनींनी त्यांचेवर झालेल्या अत्याचाराबाबत न घाबरता तक्रार देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात येते.

६. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोबाईल ॲप सुरु करण्यात आले असून मोबाईल ॲप्लिकेशनला ‘प्रतिसाद’ असे नाव देण्यात आलेले आहे. त्यावर येणाऱ्या तक्रारीनुसार चौकशी करण्यात येऊन कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

७. मालमत्तेचे गुन्हे रोखण्यासाठी सर्व पोलीस स्टेशन हद्दीमध्ये नियमित रात्र गस्त करण्यासाठी वेगवेगळे सेक्टर तयार करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) मिळविण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करण्यात आल्याबाबत

**(२९) * १२०४३४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) मिळण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करुन इमारत बांधतांना नियमांचा भंग करण्यात आल्याची बाब सक्तवसुली संचालनालयाच्या माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) एच-पश्चिम विभाग, वांद्रे (मुंबई) येथील जमात-ए-जमोरीया या झोपडपट्टी पुनर्वृसन योजने संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे सक्तवसुली संचालनालयामार्फत चौकशीसाठी माहे एप्रिल, २०१७ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मागविण्यात आली आहेत. या कागदपत्रांची सक्त वसूली संचालनालयाच्या स्तरावर छाननी चालू आहे.

(३) सक्त वसुली संचालनालय कार्यालयाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कोणतेही निर्देश देण्यात आलेले नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रभागातील ९८ टक्के बर्फाचे नमुने दुषित असल्याबाबत

**(३०) * ११६७९६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्डातील ९८ टक्के बर्फाचे नमुने दुषित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुषित बर्फाचे हे नमुने सर्वात जास्त रस्त्यावर विकणाऱ्या सरबतांच्या दुकानातून, हॉटेल्स आणि बर्फापासून बनविण्यात येणाऱ्या पादार्थांच्या दुकानातून जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तपासात कॉलीफॉम ९८ टक्के तर ८६ टक्के नमुने कोलायुक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे आहे काय, तसेच अशा प्रकारे दुषित बर्फ विकणाऱ्या दुकानदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच दुषित बर्फ पुरवठा रोखण्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना करणार वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने दिनांक १२ एप्रिल, २०१८ मध्ये उपहारगृहे, रसवंतीगृहे, फळांच्या रसांची दुकाने इत्यादींच्या केलेल्या पाहणीमध्ये ८६ टक्के नमुने कोलाययुक्त व ९८ टक्के नमुने कॉलीफॉमयुक्त असल्याचे आढळून आले आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(४) व (५) माहे एप्रिल व मे, २०१८ या कालावधीत मुंबई शहर व उपनगर परिसरात दुषीत बर्फ आढळलेल्या आस्थापनांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

- ३९० आस्थापनांना निरिक्षण अहवाल (आय.आर.) देण्यात आले आहेत.
- ९० आस्थापनांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.
- ६ बर्फ उत्पादक आस्थापनांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.
- ७४,५२९ किलो बर्फ नष्ट करण्यात आला आहे.

मुंबईतील बर्फ उत्पादक तसेच खाद्यपदार्थांसाठी बर्फाचा वापर करणाऱ्या आस्थापना निरिक्षणाखाली ठेवण्यात आल्या आहेत.

-----------------

## कुपवाड पोलीस स्टेशन (सांगली) येथे तक्रार करण्यास गेलेल्या दोन भावांना पोलीसांकडून जबर मारहाण करण्यात आल्याबाबत

**(३१) * ११७५९५ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगलीतील कुपवाड पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास गेलेल्या दोन सख्या भावांना दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री.भारत शिंदे यांच्यासह चार पोलीसांनी काठीने जबर मारहाण केली व त्यांची तक्रार ही दाखल करुन घेतली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तदनुसार दोषी पोलीस निरिक्षक व इतर कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. पोलिसांकडून मारहाण झाली नसून सुहास व गणेश गंभीरे यांचे सांगणेवरुन दिनेश साळुंखे यांचेशी झालेल्या झटापटीत ते जखमी झाले असून, पोलीसांनी मारहाण केली यामध्ये तथ्य नाही.

(२) सदर प्रकरणी उप विभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग, मिरज यांनी प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन चौकशी केली असून, सदर प्रकरणात सपोनि व इतर कर्मचारी दोषी आढळून येत नसल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) पोलीसांकडून वेळीच कार्यवाही झालेली असल्याने विलंब झालेला नाही.

-----------------

## नाशिक येथील बांधकाम क्षेत्राला भेडसावणाऱ्या एफएसआयच्या समस्येबाबत

**(३२) * ११८३४७ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या बांधकाम क्षेत्राला गत साडेतीन वर्षापासून भेडसावणारी समस्या शासनाच्या अनधिकृत बांधकाम नियमितीकरणाच्या धोरणातून सुटण्याचा दावा महानगरपालिका आयुक्तांनी केला असला तरी प्रत्यक्षात बांधकामधारकांनी नऊ मीटरखालील रस्त्यालगतच्या इमारतीसाठी यापूर्वीच १ बेसिक एफएसआयसह ०.४० टीडीआरचा वापर केला असल्याने शासनाने अनधिकृत बांधकामांच्या नियमितीकरणासाठी देऊ केलेला ०.३ टक्के अतिरिक्त एफएसआय लागू होणार नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) शासनाने दि.३१/१२/२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अ अंतर्गत उक्त अधिनियमाच्या कलम १५८(१) अन्वये नियम केलेले असून ते दि.०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे मंजूर केलेले आहेत व दि.१०/१०/२०१७ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून लागू झालेले आहेत. सदर नियमातील तक्त्यातील तरतूद क्र.९ नुसार जिना, पॅसेजची रुंदी, बाल्कनी, टेरेस, इत्यादी चटई क्षेत्र निदेर्शांकामध्ये गृहीत न धरलेल्या बाबींमधील अनियमितता तरतूद क्र.३ मध्ये नमूदनुसार टिडीआर अथवा प्रिमियम चटई क्षेत्र निर्देशांक यांच्या माध्यमातून त्यामर्यादेत याबाबतचे /प्रशमन शुल्क आकारुन प्रशमित करावयाचे आहेत.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दाट वस्तीचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रातील ९.० मी. पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याची रुंदी ९.० मी. करणेकरिता महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये कार्यवाही सुरु केलेली असून सदरची वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध होणारा प्रिमियम चटई क्षेत्र निर्देशांक तसेच टिडीआर

या माध्यमातून मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांका पेक्षा जास्त केलेले बांधकाम प्रशमन शुल्क आकारुन“प्रशमित संरचना” म्हणून घोषित करता येवु शकेल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाकिस्तानातून दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्याला जोगेश्वरी (मुंबई) येथून अटक करण्यात आल्याबाबत

**(३३) * १२१५२८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाकिस्तानातून दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्याला राज्य दहशतवादविरोधी पथकाने मुंबईत (एटीएस) दिनांक ११ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र एटीएसच्या जुहू शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार जोगेश्वरी येथून सदर कट्टर दहशतवादी फैजल मिर्झाला अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दहशतवादी फैजल मिर्झा यांस दि.११.०५.२०१८ रोजी अटक करण्यात आली असून यासंदर्भात द.वि.प. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०/२०१८, कलम १६,१८,१८(अ), १८ (ब), २० बेकायदेशीर (प्रतिबंधक) कृत्ये अधिनियम, १९६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

आहे. सखोल चौकशी मध्ये फारुक देवडीवाला ऊर्फ फारुक अब्दूल गनी मेमन यांने पाकीस्तानातील दहशतवाद्यांशी संगनमत करुन मुंबई, गुजरात व उत्तरप्रदेश येथे दहशतवादी हल्ल्याचा कट पुर्णत्वास नेण्यासाठी पाकीस्तानातील दहशतवादी प्रशिक्षण केंद्रामध्ये फैजल मिर्झा यांस प्रशिक्षणासाठी पाठवल्याचे निष्पन्न झाले. तसेच फैजल मिर्झाचा मित्र अल्लारखा मन्सुरी हा सदर कटात सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास गु.र.क्र. १०/२०१८ मध्ये दि.१६.०५.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## क्रिप्टो करन्सी या नावाने राज्यातील अनेक गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(३४) * ११८२३० श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंटरनॅशनल डिजिटल कंपनी असल्याचे भासवून झिपकॉईन क्रिप्टो करन्सी या नावाने गुंतवणुकीवर दरमहा पंधरा टक्के लाभांश देण्याच्या आमिषाने कोल्हापूर,सांगली,पुणे सह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणुक करणारे रॅकेट माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिप्टो करन्सीच्या माध्यमातून एका टोळीने कोल्हापूरातील व्यापा-याला जवळपास रुपये ३० लाखांना फसविल्याचे प्रकरण माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार क्रिप्टो करन्सीच्या नावाने फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) झिपकॉईन क्रिप्टो करंसी या कपंनीने गुंतवणूकदारांना दरमहा  बिटकॉईनच्या स्वरूपात १५ टक्के लाभांश देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी यांची २९,५०,०००/- रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शाहूपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे ६ आरोपींविरूद्ध गु.र.नं. २४६/२०१८ भांदवि कलम ४१९,४२०, ४०६, ४६८, १२०(ब), ३४ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, प्राईज चिट्स ॲन्ड मनी सर्क्युलेशन स्किम्स (बेनींग ) ॲक्ट १९७८ कलम ४ व ५ आणि आय.टी. ॲक्ट कलम ६६ अ व ६६ ड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयामधील सर्व ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयांच्या तपासात झिपकॉईन या कंपनीने फिर्यादी यांची २९,५०,०००/- रुपये व इतर १६ गुंतवणूकदारांची १,७२,५०,०००/- रुपये असे एकुण २,०२,००,०००/- इतक्या रमकेची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असून गुन्हा तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## खुपरी (ता.वाडा, जि.पालघर) येथील साईओम पेट्रो स्पेशालिटीज प्रा.लि. कंपनीला लागलेल्या आगीबाबत

**(३५) * ११८९२७  श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुपरी (ता.वाडा, जि.पालघर) येथील साईओम पेट्रो स्पेशालिटीज प्रा.लि. कंपनीला भीषण आग लागुन कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीत कच्च्या ऑईलवर प्रक्रिया करुन सलिडा नावाचे पक्के ऑईल तयार करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी आग लागण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनीला तसेच कंपनीत काम करणाऱ्या कामगांराना आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

मे.साईओम पेट्रो स्पेशालिटीज प्रा.लि., प्लॉट नं. २०९, खुपरी, ता.वाडा, जि.पालघर येथील कारखान्यास दिनांक ०७/०५/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजता आग लागली, हे खरे आहे.

(२) होय.

सदर कारखान्यात डिस्टीलेशन पध्दतीने वेस्ट ऑईलचे शुध्दीकरण करुन त्यापासून रिसायकल्ड ऑईल बनविले जाते.

(३) सदर आग ही वेस्ट ऑईल अनलोडींग पंपामध्ये इलेक्ट्रीकल शॉर्ट सर्कीट होवुन त्याची ठिणगी जमीनीवर सांडलेल्या वेस्ट ऑईलच्या संपर्कात आल्यामुळे लागलेली आहे.

(४) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या विभागाने चौकशी केली असून सदर आग ही वेस्ट ऑईल अनलोडींग पंपामध्ये इलेक्ट्रीकल शॉर्ट सर्कीट होवून त्याची ठिणगी जमीनीवर सांडलेल्या वेस्ट ऑईलच्या संपर्कात आल्यामुळे लागली असल्याचे आढळून आले आहे.

सदर आगीमुळे कुणीही कामगार मृत, जखमी वा बाधित झालेला नाही. त्यामुळे कामगारांना आर्थिक सहाय्य करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## खापा नगरपरिषदे अंतर्गत (जि.नागपूर) लावण्यात आलेल्या विद्युत खांबावरील एलईडी लाईटच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * १२०८४१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे**

**ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापा नगरपरिषद (जि.नागपूर) अंतर्गत १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून प्रभाग क्रमांक २ मध्ये अस्तित्वात असलेल्या विद्‌युत खांबावर एलईडी लाईट लावण्यासाठी रुपये १४ लाख २३ हजार ८९० इतका निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाची निविदा काढून हे काम वरद असोशिएट, नागपूर यांना देण्यात आले असून त्याप्रमाणे दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास करारनामा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करण्यात आलेल्या करारनाम्याप्रमाणे एलईडी लाईट लावण्यात आले नसुन यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची पुराव्यानिशी लेखी तक्रार लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास यांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदार आणि अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, याबाबत सन्माननीय नगरसेवकांच्या तक्रारी सन २०१७ मध्ये शासनाकडे / जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या.

(४) शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर यांच्याकडून याप्रकरणी तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आले आहे. त्यामध्ये क्लॅम्प ६ मि.मी. ऐवजी ३ ते ४ मि.मी. बसविल्याचे नमूद केल्याने क्लॅम्पची किंमत ५०% कमी करुन उर्वरित रक्कम कंत्राटदाराला प्रदान करण्यात आली आहे.

तक्रारींची चौकशी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून सुरु आहे. सदर चौकशी पूर्ण होईपर्यंत कंत्राटदारास सुरक्षा अनामत रक्कम प्रदान न करण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट डांबर तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * ११८९०९ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) हद्दीतील पिंपळविहीर स्थित चिकूच्या धाब्यावर धाड टाकून रसायनाचा वापर करुन बनावट डांबर तयार करणा-या टोळीला माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पोलीसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील विघ्नहर्ता कंपनीच्या नावाने विनापरवाना घातक रसायनाची अवैध विक्री होत असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास पोलीस चौकशीत समोर आले असून सदर घातक रसायनाचे मिश्रण करुन डांबर प्लांटला पाठविले जाऊन या रसायनांचा डांबर तापविण्यासाठी उपयोग केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राष्ट्रीय महामार्गावरील म्हसळे (ता.पारोळा,जि.धुळे) शिवारात बनावट डांबर तयार करण्याच्या भट्टीवर पोलीसांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये छापे टाकून केमिकल्सह लाखो रुपयांचे साहित्य पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार बनावट डांबर तयार करणा-या टोळीतील आरोपींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ पोलीस स्टेशन येथे गुरनं. १६४/२०१८, कलम २८४, २८५, ३४ भादंवि. सह कलम ८, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, सह कलम ९ (ब)(१)(२)(३) स्फोटक कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनेतील ७ आरोपींना अटक करण्यात आली होती. सद्यस्थितीत ७ ही आरोपी जामिनावर असून एक मुख्य आरोपी फरार आहे. घटनास्थळावरुन आरोपींकडून लोखंडी व प्लास्टीक ड्रम रासायनिक पदार्थ भरलेले १० चाकी दोन टँकर अंदाजे २८,२८० लीटर, रसायन मिक्स करण्याचे साहित्य व ६ मोबाईल असा एकुण १६,४८,४००/- रु.चा माल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

तसेच जळगांव जिल्ह्यातील पारोळा पोलीस स्टेशन येथे गुरनं.७२/२०१८, भादंवि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनेतील १ आरोपीला अटक करण्यात आली होती. सद्यस्थितीत आरोपी जामिनावर आहे. आरोपीकडून डांबरासारखा पदार्थ अंदाजे रु.४,०९,५००/- किंमतीचा साहित्य जप्त करण्यात आले. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाइन संकेतस्थळावरुन व कुरिअरद्वारे घातक शस्त्रांची विक्री होत असल्याबाबत

**(३८) * १२३०५६ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी ऑनलाईन शॉपिंग वेबसाईटवरून तसेच कुरिअर द्वारे तलवारी, चाकू ,जांबिया यांसारखी घातक शस्रांची अनधिकृत विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरात फ्लिपकार्ट या ऑनलाइन संकेतस्थळावरून तलवारी, चाकू, गुप्ती, कुकरी, जांबिया अशी सुमारे २८ शस्त्रांची खरेदी करण्यात आल्याचे दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील इन्स्टाकार्ड कुरिअरच्या नागेश्वरवाडी आणि जयभवानी नगर येथील कार्यालयात तलवारी, चाकू, गुप्ती, कुकरी अशा शस्त्रात्रांचा मोठा साठा गुन्हे शाखेने जप्त केला, हे ही खरे आहे, काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार अनधिकृतपणे घातक शस्रांची विक्री करून राज्यात दहशत, दंगल घडविण्यास जबाबदार असणाऱ्या अशा कुरिअर आणि वेबसाईटवर तसेच घातक शस्त्रांच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) औरंगाबाद वगळता अन्य ठिकाणी अशी घटना घडल्याचे आढळुन आले नाही.
(२) होय, हे खरे आहे.
दिनांक २८/०५/२०१८ रोजी ४२ शस्त्रांची खरेदी करण्यात आलेली असुन, औरंगाबाद शहर अंतर्गत क्रांती चौक व मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात प्रत्येकी १ गुन्हा दाखल आहे.
(३) होय, खरे आहे.
दिनांक २८/०५/२०१८ रोजी गुन्हेशाखेच्या पथकाने इन्स्टाकार्ड कुरिअरच्या नागेश्वरवाडी आणि जयभवानीनगर येथील कार्यालयात छापा घालून अनुक्रमे ३१ आणि ११ अशी शस्त्रास्त्रे जप्त केली आहेत.
(४) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. त्यात ऑनलाईन शॉपिंगद्वारे विनापरवाना, बेकायदेशीररित्या प्राणघातक शस्त्रे खरेदी, विक्री, पुरवठा केल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी भारतीय हत्यार कायदा, कलम ४ व २५ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा, कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करून गुन्ह्याच्या तपासात सहभागी आढळलेल्या आरोपींना अटक करून गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली व नाशिक जिल्यातील द्राक्ष बागायतदारांची झालेली फसवणूक

**(३९) * १२३८६० श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव तालुक्यातील (जि.सांगली) बोरगांव, सावळज व मणेराजूरी येथील सुमारे १२ द्राक्ष बागायतदारांची कोलकाता येथील द्राक्ष व्यापा-यांनी सुमारे रुपये २३ लाखांची फसवणूक केल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही गत वर्षी याच तालुक्यातील ४६ द्राक्ष उत्पादकांची रुपये ९ कोटी ४७ लाखांची फसवणूक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) सोळा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची राज्यस्थानमधील एका द्राक्ष व्यापाऱ्याने रुपये २८ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास शेतकऱ्यांनी पिंपळगाव पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणांचा तपास पुर्ण झाला आहे काय, तपासात काय आढळून आले व तदनुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

याप्रकरणी फिर्यादी व इतर शेतकरी यांची एकुण रू.२४,४०,६५७/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी ४ आरोपींविरूध्द तासगाव पोलीस स्टेशन येथे दि. २३/०३/२०१८ रोजी गु.र.नं. १००/२०१८ भा.दं.वि.स. कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(२), (३), (४) व (५) द्राक्ष बागायतदारांची एकुण २.७८ कोटी रूपयांची फसवणूक केल्याबाबत तासगाव पोलीस ठाणे येथे सन २०१७ मध्ये ७ व सन २०१६ मध्ये ४ असे एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. यापैकी दोन गुन्हयात ६

आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून ८ गुन्हे तपासावर आहेत व एका गुन्हयात 'अ' फायनल समरी अहवाल मा.न्यायालयात सादर केला आहे.

निफाड तालुक्यातील १९ द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची राजस्थान येथील एका व्यापाऱ्याने एकुण रू.४१,९५,०००/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलीस स्टेशन येथे दि. ०५/०४/२०१८ रोजी गु.र.नं. ५३/२०१८ भा.दं.वि.स. कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## अकोला येथील इंडियन मेडिकल असोसिएशनमधील बॅडमिंटन प्रशिक्षकांनी मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(४०) * १२०५८७ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील इंडियन मेडिकल असोसिएशनमधील बॅडमिंटन प्रशिक्षक (कोच) श्री.राहु सरकटे यांनी सुमारे १० ते १२ मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण आयएमएचे पदाधिकाऱ्यांनी दडविल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची तक्रार घेण्यास सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याने हलगर्जी केल्यामुळे पीडित मुलीने पोलीस अधिक्षकांना सदर बाब लेखी निवेदनाद्वारे अवगत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हलगर्जीपणामुळे अल्पवयीन मुली व युवतींवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकारांना वाव मिळत असल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणातील दोषी, आयएमएचे पदाधिकारी व

सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यातील जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

आयएमएचे पदाधिकारी यांचेकडे कोणीही पिडीतेने लेखी किंवा तोंडी तक्रार केली नसल्याचे त्यांनी जबाबात सांगितले आहे.
(२) पोलीस अधिक्षकांना यासंबंधी निनावी तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीविरूध्द सिव्हील लाईन पोलीस स्टेशन जिल्हा अकोला येथे गु.र.नं. २३६/२०१८ कलम ३७६ (एफ.आय. एन.के), ३५४ (अ), ५०६ भा.दं.वि. सह कलम ४, १२, १४ पोक्सो ॲक्ट, सह कलम ६६ (ई) आय. टी. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपीस अटक करण्यात आली. सद्यस्थितीत आरोपीस जामीन मिळाला असून सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील मनोरंजन मैदानाचा होत असलेला गैरवापर

**(४१) * १२१३९१ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहनमुंबई महानगरपालिका के/पूर्व विभागाचा विकास नियोजन आराखडा सन १९९२ नुसार मौजे-मरोळ येथील न.भू.मा.क्र. १४८३, १४९१, १४९५, १४९६, १४९७, १५०० व १५०३ आणि न.भू.मा.क्र. १४२०, १४३७, १४४५, १४४८, १४३९, १४५७, १४४३ व १४८५ हे भूखंड (Recreation Ground) मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मनोरंजन मैदानांपैकी ५० % भूभागावर C-१ हॉटेल झोन व उर्वरित ५०% भागातील १५% भूभागावर क्लब हाऊस विकसित

करून सामान्य जनतेसाठी मर्यादित वेळेसाठी खुला करण्याचे शासनाने राजपत्र अ. क्र.TPB-४३९२ /७१६/CR-१८१/९२/UD-दि. १२/१२/१९९२ अन्वये आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, Marlborough Hotels (ललित) आणि M/s.Narang Hotels Pvt. Ltd यांनी सदर मनोरंजन मैदानाचा विकास करून लग्नकार्य व इतर समारंभाकरीता कायमस्वरूपी सेट उभारून मनोरंजन मैदानाचा अनधिकृत वापर सुरु आहे व सर्वसामान्य जनतेकरीता ते खुले करून दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारत प्रस्ताव फाईल क्र.CE/८६७३/WS/AK दि. २२ नोव्हेंबर २००५ अन्वये Indian Hotels Pvt. Ltd. (J.W.Marriott) यांना परवानगी देण्यात आली असून त्यांचे बांधकाम अद्यापही सुरु असताना तसेच मनोरंजन मैदानाचा विकास अपूर्ण असून ते सामान्य जनतेला खुले होण्यापूर्वीच शासनाने व महानगरपालिकेने घातलेल्या अटी व शर्तींची पूर्तता झालेली नसतानाही बृहनमुंबई महानगरपालिकेकडून नियमबाह्य ताबा प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील अनियमितता व आदेशाच्या उल्लंघनाबाबत तक्रार प्राप्त होऊनही बृहनमुंबई महानगरपालिकेने कोणतीही कारवाई केली नाही, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभागाचा विकास नियोजन आराखडा सन १९९२ नुसार मौजे-मरोळ येथील न.भु.मा.क्र. १४८३, १४९१, १४९५, १४९६, १५०० व १५०३ आणि न.भू.मा. क्र.१४३७, १४४५, १४४८, १४३९, १४४३ व १४८५ हे भुखंड (Recreation Ground) मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभागाची विकास योजना शासन अधिसूचना दि. १२/११/१९९२ नुसार मंजूर झाली असून मंजूर विकास योजना १९९१ नुसार सदर जमिनीवरील मनोरंजन मैदानाकरीता आरक्षित जमिनीपैकी ५०% जमिन पार्क करीता आरक्षित ठेवावी, त्याचे भूसंपादन करु नये. शिल्लक जमिनीवरील आरक्षण रद्द करुन त्याचा हॉटेलकरीता फक्त वाणिज्य (C-१) झोनमध्ये त्याचा खालील अटीवर समावेश केला आहे.

अट :- मालकाने हॉटेलचा विकास करण्यापूर्वी सदर पार्क विकसित करावे व त्याची देखभाल करावी व मर्यादीत वेळेकरीता सर्वसामान्य लोकांकरीता खुले ठेवावे.

(३), (४), (५) व (६) हॉटेल कॉम्प्लेक्स (इमारत क्र.२) साठी महापालिकेने Indian Hotels Pvt. Ltd. (J.W.Marriott) यांना दि. २२ नोव्हेंबर २००५ रोजी IOD दिली आहे. त्यानंतर बांधकाम प्रारंभ परवानगी, बांधकाम पूर्ण करण्यास परवानगी देण्यात आल्या असून महापालिकेने सदर इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दि. १६/०२/२०१५ रोजी दिले आहे.

भूभागापैकी ५०% भूभाग मनोरंजन मैदानासाठी आरक्षित असून अटींनुसार सदर मैदान विकसित झाले असून सामान्य जनतेसाठी ते खुले आहे. शासनाच्या व महापालिकेच्या अटी व शर्तींचे पालन झाल्यानंतरच हॉटेल इमारतीस महापालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.

विषयांकित मनोरंजन मैदानाच्या अनधिकृत वापराबाबत प्राप्त तक्रारींची तपासणी करुन त्याबाबत वस्तूस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक २/७/२०१८ चे पत्रान्वये आदेशित केले आहे.

-----------------

## राजापूर शहर ते आंबेवाडी, हर्डी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या गावांना जोडणा-या वासुदेव काका जोशी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) * १२१२६० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर शहर ते आंबेवाडी, हर्डी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या गावांना जोडणा-या वासुदेव काका जोशी पुलाची दुरवस्था झाली असून अनेक वर्षांपासून पुलाची दुरुस्ती न केल्याने पुलाचे खांब जीर्ण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर पूल वाहतुकीस धोकादायक झाला असून कोणत्याही क्षणी कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने ग्रामस्थांकडून पुलाची दुरुस्ती करण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन स्थानिक नगरसेवक यांच्याकडून दि.१७/०४/२०१८ रोजी नगरपरिषद प्रशासनास प्राप्त झाले, हे खरे आहे.
(३) व (४) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने नगरपरिषद अभियंता यांच्यामार्फत सदर पुलाची पाहणी करण्यात आली. त्यानुसार पुलाच्या खांबाचे खालील भागातील काँक्रीट काही अंशी निघाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे.
• सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट तात्काळ करुन घेण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सूचना दिल्या आहेत.
• अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये एल.ई.डी. लाईट फिटिंगकरिता काढलेल्या निविदेबाबत

**(४३) * १२२२०४ श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये एल.ई.डी. लाईट फिटिंगकरिता सुमारे रुपये २३५ कोटींची निविदा काढली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निविदा प्रक्रियेस प्रतिसाद देणारी ठेकेदार कंपनी मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टम प्रा.ली. या कंपनीने अमर्याद वाजवी पेक्षा जास्त दर लावून निविदा भरली असतांना या कंपनीस काम करण्याची संधी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे रुपये ७० कोटी बाजार भावापेक्षा जास्त रक्कम या कामात ठेकेदारास मिळावी याकरिता ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमत करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निविदेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा अपहार करून महानगरपालिकेची फसवणूक केल्याबाबत संबंधित ठेकेदार व अधिकारी यांची शासनातर्फे चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये औरंगाबाद शहरात एल.ई.डी. पथदिवे बसविण्यासाठी महानगरपालिकेने रुपये ११२.२१ कोटीची निविदा काढली होती हे खरे आहे.
(२), (३) व (४) • औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वात असलेले जुने पथदिवे बदलून त्याऐवजी एल.ई.डी पथ दिवे लावणे, त्यांचे नुतनीकरण करणे, मुलभूत सुविधांची कामे करणे इत्यादी करीता महानगरपालिकेने जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम रु.१११.७५ कोटी इतकी आहे.
• सदर प्रकरणी राबविलेल्या निविदा प्रक्रीयेत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्या.
• एकमेव पात्र ठरलेले निविदाकार मे. इलेक्ट्रॉन लाईटींग सिस्टम प्रा.ली. यांनी रु.११२.२१ कोटी रक्कमेची निविदा सादर केली.
• सदर निविदेची रक्कम अंदाजपत्रकापेक्षा केवळ ०.४२ % (रु. ४६ लाख) जास्त आहे, ही वस्तुस्थिती आहे.
• आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निवड समितीने मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टम प्रा.लि. या कंपनीने सादर केलेले दर योग्य व वाजवी असल्याने त्यांना सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले.
• सदर कार्यादेशाविरुद्ध मे. शहा इनवेस्टमेन्ट व पॉलिकॅप प्रा.ली. यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सदर याचिकेच्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने सदर कार्यादेश रद्द केले.

• मा.उच्च न्यायायलयाच्या आदेशाविरुध्द मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टम प्रा.लि. यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले असता मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर अपिल काही अटींवर मंजुर केले. त्यानुसार मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टम प्रा.लि. त्यांना या कामाचे सुधारित आदेश दिनांक १/९/२०१६ रोजी देण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महिलांविरोधी गुन्ह्यांसाठीच्या विशेष पथकाची स्थापना करणेबाबत

**(४४) * ११८६२७ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांविरोधी गुन्ह्यांचे वाढते प्रमाण व अशा गुन्ह्यांतील शिक्षेचे अल्पप्रमाण यावर उपाय म्हणून केंद्र शासनाने दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजीच्या निर्णयानुसार ठरविलेल्या महिलांविरोधी गुन्ह्यांसाठीच्या विशेष पथकाची निर्मिती राज्यात अद्यापही झालेलीच नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार सदर पथक स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महिलांचा विनयभंग, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार इत्यादी प्रकारच्या महिलांवरील अत्याचारांच्या घटनांचा सखोल, परिपूर्ण व तातडीने तपास करून, आरोपींविरूध्द तात्काळ खटले दाखल करण्याची कार्यवाही करणे याकरीता जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र महिला पोलीस तपास पथक स्थापन करणेबाबत विभागाच्या शासन निर्णय क्र.पीएडब्ल्यू-०६१६/ प्र.क्र.४९२/ विशा-६, दिनांक १२/१०/२०१७ प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्यात सर्व जिल्हयात विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात विशेषत: ठाणे, पालघर व मुंबईमध्ये अंमलीपदार्थ तयार करुन त्याची अनधिकृत विक्री होत असल्याबाबत

**(४५) * ११९५४८ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील शारदा केमिकल्स कारखान्यात द्रवरुपातील एमडीचा सुमारे रुपये साडे सात कोटींचा साठा अंबोली पोलीसांनी जप्त केला असून बोईसर (जि.पालघर) येथे एमडी हा अंमली पदार्थ तयार करणा-या एका प्रयोग शाळेत छापा टाकून नाशिक पोलीसांनी सुमारे रुपये २ कोटींचा एमडी साठा जप्त केला आहे तसेच मेफ्रेडोन (एमडी) हे नाशिक शहरात विक्रीसाठी आणतांना काही संशयितांना अटक केल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भायखळा मतदारसंघ (मुंबई) परिक्षेत्रातील खडा पारसी, मोंन्टे साऊथ समोर, रेल्वे फाटकजवळ अनेक दिवसांपासून नायजेरियन नागरिक एमडी व तत्सम अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक यांनी मा.मुख्यमंत्री, पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३ (मुंबई) यांच्याकडे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी स्वरूपात केली असून मुंबईतील सँडहर्स्ट रोड रेल्वे स्टेशन पासून कसारा, कर्जत पर्यंत व हार्बर लाईनवरील सर्व रेल्वे फाटकांजवळ नायजेरियन नागरिकांचा चमु राजरोसपणे एमडी व तत्सम अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याचे निर्दशनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वडाळा, मुंबई येथील महाविद्यालयाबाहेर गांजा विक्री करणा-या तरुणीला अंमली पदार्थविरोधी पथकाने अटक केली असुन केलेल्या चौकशीतून नाशिकमधील चरस-गांजा वितरकांची नावे समोर आले असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, याच दरम्यान मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने माटूंगा येथे केलेल्या कारवाईत एका व्यक्तीकडून सुमारे रुपये सहा कोटींचे ‘हेरॉइन’ जप्त केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे वा तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,

(६) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

बदलापूर जि.ठाणे येथील घटना दि.१४.४.२०१८ रोजी घडली असुन रुपये सात कोटी पन्नास लाख इतक्या किमतीचे ७८.५०० किलोग्रॅम मेफेड्रॉन (एमडी अंमली पदार्थ)जप्त करण्यात आला आहे.

नाशिक शहर पोलीसांनी दि.१६.५.२०१८ रोजी पाथर्डी फाटा हॉटेल रायबा जवळ तीन आरोपीत रणजीत गोविंदराव मोरे, पंकज भाऊसाहेब दुंडे, नितीन भास्कर मोळोदे हे एमडी नावाचा अंमली पदार्थासहित आढहून आले. पुढील

तपासात सदरील अंमली पदार्थ त्यांनी नदीम सलीम सौराखीया याचे कडून आला असल्याचे समजले. त्याला पकडले असता त्याच्याकडे एकूण २४०० ग्रॅम एमडी आढळून आला. सदर प्रकरणी हरिशचंद्र उरवादत्त पंत रा.बोईसर याच्या घरी ४५०० ग्रॅम एमडी पदार्थ व १८ किलो एमडी क्रुड पॉवडर मिळून आली. सदर पॉवडर त्यांनी राजीवकुमार बद्रीनारायण झा रा.अंकलेश्वर जि.गुजरात यांच्याकडून आणली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार राजीवकुमार बद्रीनारायण झा यास अटक करण्यात आली व त्याचे घरी एमडी क्रुड तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले.

(२) अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत वारंवार केलेल्या गस्ती दरम्यान असे निदर्शनास आले आहे की अंमली पदार्थाची विक्री रेल्वे फाटकाजवळ होत नसून रेल्वे रुळावर होत असते.

सन २०१७-१८ या वर्षात अद्यापपर्यंत अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एकूण २० नायजिरियन नागरिकांना कारवाई करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, विक्रोळी युनिटने एस.आय.डब्लु.एस. कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोर शिवडी वडाळा रोड येथे गांजा विक्री करणारी महिला नामे जिनत समीर शेख कडून १५ किलो ३८० ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला.

(४) होय, हे खरे आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट पथकाने दि.१४.४.२०१८ रोजी मध्ये रेल्वेचे बहुउद्देशीय चिकीत्सालयाच्या बाजुला, टी.एच.कटारिया मार्ग, माटुंगा पश्चिम येथे आरोपी नामे मांगीलाल कजोडमल मेघवाल यास अटक करण्यात आली. सदर आरोपीकडून ४ किलो १०० ग्रॅम "हेरॉईन" हा अंमली पदार्थ किंमत रुपये ६,१५,००,०००/- (सहा कोटी पंधरा लाख रुपये) जप्त करण्यात आले.

(५) बदलापूर जि.ठाणे याप्रकरणी शाहीद हुसेन शेर मोहम्मद शह व नारायणभाई मंगलदास पटेल यांना अटक करण्यात आली आहे. अंबोली पोलीस ठाणे यांच्याकडून आरोपीताविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण झाला असून दिनांक २३.६.२०१८ रोजी दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे.

नाशिक शहर पोलीसांनी त्याच्याकडील प्रकरणात एकूण आठ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द गुरक्र. १३०/२०१८ एनडीपीएस कलम २२ व २५ प्रमाणे गुनहा दाखल करण्यात आला आहे.

विक्रोळी युनिटने जिनत समीर शेख या महिलेविरुध्द अंपविक्र गुरक्र.२०/२०१८ कलम ८ (क) सह २० एन.डी.पी.एस कायदा १९८५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात तिला अटक करण्यात आली. सध्या ती जामीनावर मुक्त आहे.

बांद्रा युनिट पथकाने आरोपीत इसमांविरुध्द अंपविक गु.र.क्र. २१/२०१८ कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस कायदा १९८५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात अवैध दारु जप्त केल्याबाबत

**(४६) * ११७०५५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरणगाव (ता.नगर, जि.अहमदनगर) येथे सहायक पोलीस अधिक्षकांच्या पथकाने छापा टाकून ३ ते ४ लाख रुपयांची अवैध विदेशी दारु जप्त केल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच निघोज (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे दारुबंदी असतानाही हॉटेलमधून बेकायदेशीरपणे दारुची विक्री केली जात असल्याने पोलीसांनी सहा हॉटेलांवर छापा टाकून सुमारे रुपये १ लाख ३४ हजारांची देशी व विदेशी दारु जप्त केल्याचे दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे अवैध दारु निर्मितीसाठी वापरण्यात येणारे स्पिरिटसारखे प्राणघातक रसायन जामखेड येथून श्रीगोंदा मार्गे उरुळीकांचन (जि.पुणे) येथे घेऊन जात असताना पोलीसांनी दोघा व्यक्तींना पकडून रसायनाचे २० ड्रम व एक चारचाकी वाहन जप्त केल्याचे दिनांक २४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणांतील दोषींना पोलीसांनी अटक करुन चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२), (३) व (४) अरणगाव (ता.नगर, जि.अहमदनगर) येथे रुपये ६,३६,३५८/- किंमतीची देशी/विदेशी दारु बाळगल्या प्रकरणी दिनांक २४.०४.२०१८ रोजी नगर तालूका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५७/२०१८ मु.प्रो.ॲ.क.६५(ई) प्रमाणे १ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे

निघोज (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील ६ हॉटेलवर पोलीसांनी छापा टाकून सुमारे १ लाख, ३ हजारांची देशी व विदेशी दारु जप्त केली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस स्टेशन येथे ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या कब्जात दारू बाळगणाऱ्या एकुण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हे तपासावर आहेत.

सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२३/२०१८ भा.दं.वि. कलम ३२८,३४ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम १०८, सह मोटार वाहन कायदा कलम १३२,१२९,१८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात रु. ४,००,०००/- ची चार चाकी गाडी व रु. ८०,०००/- चे द्रव पदार्थ असे एकूण रु ४,८०,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## वाघिवली (पनवेल) गावातील ६६ कुळांना फसवून सिडकोने एका जमिनदाराला मोक्याचा भूखंड दिल्याबाबत

**(४७) * ११८०१२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियमानुसार जमीनदार आणि सावकारांना साडेबारा टक्के योजनेतील भूखंड देता येत नसतांनाही सिडकोने वाघिवली (पनवेल) गावातील ६६ कुळांना फसवून श्री मुंदडा नावाच्या जमिनदाराला नवी मुंबईतील मोक्याचा ५३ चौ.मी.चा भूखंड दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसंपादन पनवेलच्या वाघिवली गावात झाले असतांनाही अधिका-यांनी भूखंड बेलापूरमध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषी अधिका-यांवर व जमिनदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई प्रकल्पासाठी मौजे वाघिवली येथील मूळ जमिनधारक श्री.जुगलबक्ष हनुमानबक्ष मुंदडा व इतर यांच्या संपादित करण्यात आलेल्या ६०-८३-८ हे.आर. जमिनीसंदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांनी पारीत केलेल्या निवाड्याच्याआधारे जमिनधारकाच्या कायदेशीर वारसांना १२.५ टक्के योजनेंतर्गत ५३,२०० चौ.मी. भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(२) व (३) नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी संबंधीत भूधारकास १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंडाचे वाटप करण्यासाठी खारघर व कामोठे नोडमध्ये जागेची कमतरता असल्याने तसेच पनवेल येथील जमिनीचे मुल्य वाघिवलीपेक्षा अधिक असल्याने सिडको महामंडळाकडील लिंकेज कमिटीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार व संबंधित भूधारकाने जसा आहे तसा भूखंड स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने संबंधित भूधारकास बेलापूर नोडमधील सेक्टर ३०/३१ येथील टेकडी सदृश जागा वाटप करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी सन, २०१७ च्या हिवाळी अधिवेशात उपस्थित लक्षवेधी सूचनेवरील आश्वासनाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी सिडकोकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल घेण्यात आला होता. सदर अहवाल विचारात घेवून सदर भूखंड वाटपाच्या अनुषंगाने सिडको महामंडळाच्या दि.८.६.२०१६ च्या

पत्रास शासनाच्या दि.२२.१२.२०१७ नुसार देण्यात आलेली स्थगिती रद्द करुन प्रकरणाची वस्तुस्थिती रिट याचिका क्र.९२१२/२०१४ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याबाबत दि.२३.५.२०१८ च्या पत्रानुसार सिडको महामंडळाला कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहेगाव (ता.सेलू,जि.वर्धा) येथील एका आदिवासी युवतीची हत्या करण्यात आल्याबाबत

**(४८) * १२०८५८ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहेगाव (ता.सेलू, जि.वर्धा) येथील श्रीमती शुभांगी उईके या आदिवासी युवतीची माहे मार्च-एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान हत्या करून तिचा मृतदेह रेल्वे रूळावर नेऊन टाकण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात केल्यानंतर सुध्दा या प्रकरणाचा तपास संथ गतीने सुरू असून ठाणेदाराकडून आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची चौकशी करून दोषी व्यक्तींवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी आदिवासी संघटनेनी वर्धा जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. मृतकाचे आरोपी यांच्याबरोबर प्रेमसंबध होते. आरोपीने त्याचे एकत्रित फोटो व्हॉट्सपवर प्रोफाईल पिक्चर म्हणून ठेवला होता. त्यामुळे मृतकाची बदनामी झाल्याने व आरोपीने मृतकाच्या आईला शिवीगाळ केल्याने दु:खी होऊन रेल्वे ट्रॅकवर जाऊन आत्महत्या केली

आहे. सदर अकस्मात मृत्यू क्र.०७/१८ कलम १७४ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर घटनेच्या चौकशीअंती आरोपीविरुध्द पो.स्टे. दहेगांव येथे अप क्र.२८/१८ कलम ३०६, २०१, ५०१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

(२) नाही. सदर प्रकरणी तपास हा स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांनी पुर्ण केला असून सदर तपासात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(३) होय. सदर प्रकरणी पोलीस अंमलदारास तातडीने पोलीस स्टेशन येथून पोलीस मुख्यालयात संलग्न केले असून त्यांच्याविरुध्द प्राथमिक चौकशी सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी सदर आरोपीविरुध्द पो.स्टे. दहेगांव येथे अप क्र.२८/१८ कलम ३०६, २०१, ५०१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.सदर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरांचे भाडे विकासकाने थकविल्याबाबत

**(४९) * ११९८९४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राज पुरोहित (कुलाबा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील १५०० घरे विकासकांनी घेवून त्यांचे ११८ कोटींचे भाडे थकविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसुलीसाठी अधिका-यांनी विकासकांवर कारवाई करण्यासाठी मुख्य अधिका-यांकडे पाठविण्यात आलेला प्रस्ताव फेटाळल्याने विकासकांना म्हाडाकडून अभय मिळाले असल्याची बाब दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव फेटाळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने थकीत रकमेचा भरणा करणेबाबत तसेच थकीत रकमेचा भरणा न केल्यास म्हाडा अधिनियम, १९७६ चे कलम ९५ अ (३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करुन संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीसा विकासकांना देण्यात आल्या आहेत. परंतू सदर नोटीशीला विकासकांमार्फत कुठलाही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, विकासक पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीसा (Stop Work Notice) देण्यात आल्या आहेत. तसेच म्हाडा अधिनियम, १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशील व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विकासक यांचे जंगम स्थावर मालमत्तेचा तपशील मागविण्यात आलेला आहे.

तसेच विकासकांना काम थांबविण्याची नोटीस दिल्यानंतर मे, २०१८ अखेर थकित असलेली रक्कम रु. १२१.२३ कोटी पैकी माहे मे, २०१८ पर्यंत रुपये ७०.०४ कोटी इतकी रक्कम विकासकाकडून वसूल करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घुंगशी ग्रामपंचायत (जि.अकोला) निवडणुकीवरुन दोन गटात झालेल्या मारहाणीबाबत

**(५०) * ११७१४९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),**

**श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील घुंगशी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीवरुन दोन गटामध्ये झालेल्या मारहाणीमध्ये अनेक लोक गंभीर जखमी होऊन एका महिलेचा विनयभंग झाल्याचा प्रकार अलिकडेच निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अकोला जिल्ह्यातील घुंगशी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीवरुन दोन गटामध्ये मारहाण झाली. सदर मारहाणीमध्ये फक्त एक इमस जखमी झालेला असून, महिलेचा विनयभंग झाल्याचा प्रकार घडलेला नाही.

(२) व (३) सदर घटनेमधील ३ आरोपींविरुध्द पो.स्टे. मुर्तिजापूर येथे अप कलम नंबर ४३/२०१८ कलम ४५२, ३२५, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, मुर्तिजापूर यांनी अटकपुर्व जामिनावर सोडले आहे. उपरोक्त गुन्ह्यातील आरोपीपैकी एका आरोपीने दिलेल्या फिर्यादीवरुन पो.स्टे.मुर्तिजापूर ग्रामीण येथे एन.सी.नं.७८/२०१८ कलम ३२३, ५०४ भा.दं.वि. प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात शु.नं.२५९/२०१८ कलम १०७, ११६ (३) जा.फौ. प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करण्यात आला असून सदर गुन्ह्यात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको वसाहतीतील नालेसफाई झाली नसल्याबाबत

**(५१) * १२०२३३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको वसाहतीतील मान्सूनपूर्व नालेसफाई न केल्यामुळे उक्त परिसरात पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून पूरसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान नदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र सपाटीपासून साडे तीन मिटर खाली सिडकोने निर्माण केलेल्या कळंबोली वसाहतीमध्ये सिडकोच्या नियोजनशुन्य कारभारामुळे दरवर्षी पुरसदृश स्थिती निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मान्सूनपूर्व नालेसफाई करण्यास हलगर्जी करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नालेसफाई तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

नवी मुंबईमधील कंळबोली नोडचा विकास सिडकोने केलेला असून सदर नोड समुद्र सपाटीपासून २.२ मीटर ते ५.१ मीटरच्या वर आहे.

(३) सन, २०१८ मध्ये सिडकोच्या कार्यपध्दतीनुसार दि.१५.५.२०१८ ते दि.१५.६.२०१८ या कालावधीत ७८ स्थानिक प्रकल्पग्रस्त गटांच्या गटप्रमुख ठेकेदारांमार्फत कळंबोली विभागातील नालेसफाईचे काम करण्यात आले असून या कामात पावसाळापूर्व नाल्यांची स्वच्छता व देखभाल करण्याच्या कामांचाही समावेश आहे. तसेच कळंबोली विभागातील सेक्टर ७,१९, १६-ई, ७-ई व ९ येथील पाण्याचा निचरा योग्यरितीने होण्यासाठी धारण तलाव बांधण्यात आले आहेत.

सेक्टर ७,९ व १९ येथील धारण तलावांत खारफुटी वनस्पतींची वाढ झाल्यामुळे साचलेला गाळ काढणे शक्य होत नसल्याने येथील ७ ठिकाणी पावसाळी कामांतर्गत पंप बसविण्याची तरतूद सिडकोमार्फत करण्यात आलेली आहे. सदरहू कामे सहायक अभियंता व सहायक कार्यकारी अभियंता यांच्या देखरेखीखाली करण्यात आलेली असून कंळबोली विभागात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यासंदर्भात सिडकोकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात मानखुर्दमधील पाच जणांचा झालेला मृत्यू

**(५२) * ११७११६ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात होऊन मानखुर्दमधील पाच जणांचा मृत्यु होऊन सहा जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघातातून बचावलेल्या दोन जणांनी मदतीसाठी अनेकदा पोलीस नियंत्रण कक्षाला दुरध्वनी केला तरीही त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने मृतांची संख्या वाढली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस नियंत्रण कक्षाकडून मदत न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच या अपघाताबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार अपघातास कारणीभूत असणाऱ्या दोषींवर तसेच प्रतिसाद न देणा-या पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. सदर घटना दिनांक ३०.०४.२०१८ रोजी पहाटे ०५.०० चे सुमारास मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील देवद (ता.पनवेल) गावाच्या हद्दीत घडलेली असून त्यामध्ये पाच जणांचा मृत्यु झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) खबर मिळताच पोलीस मदत वेळेवर पोहोचली.

(४) दिनांक ३०.०४.२०१८ रोजी पहाटे ०५.०० चे सुमारास मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील देवद (ता.पनवेल) गांवाचे हददीत मारुती ओम्नी या बंद पडलेल्या वाहनास फिर्यादी हे पुणेकडून मुंबईच्या दिशेने त्यांच्या सहकाऱ्यांसह पाठीमागून धक्का मारुन नेत असतांना मुंबईकडे येणाऱ्या टेम्पोने वाहनास ठोकर मारल्याने अपघात घडला. यामध्ये ३ जण हे जागीच तर २ जण उपचारादरम्यान मृत्यु पावले. इतर २ जणांना काहीएक मार लागलेला नाही.

यាप्रकरणी दिनांक ३०.०४.२०१८ रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११४/२०१८, भा.दं.वि. ३०४(अ), २७९ ख, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघातास कारणीभूत ठरलेल्या आरोपी टेम्पोचालकास दिनांक ०१.०५.२०१८ रोजी अटक करण्यात आली असून त्यास मा.न्यायालयाने दिनांक ०२.०५.२०१८ रोजी जामीनावर मुक्त केले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## कर्वेनगर (पुणे) नदीपात्रात नव्याने आखण्यात आलेल्या निषेधक पुररेषेत अनधिकृत बांधकामे झाल्याबाबत

**(५३) * ११६६५० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्वेनगर (पुणे) नदीपात्रात नव्याने आखण्यात आलेल्या निषेधक पुररेषेत (निळ्या रेषेत) मंगल कार्यालये, रेस्टॉरंटची बांधकामे झाली असल्याची गंभीर बाब मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी नदीपात्रातील रस्त्याची दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात व्यावसायिक बांधकामे, व्यवसाय होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी अशा स्वरूपाच्या निषेधक पुररेषेतील मंगल कार्यालये, रेस्टॉरंटच्या बांधकामांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले असतांना अद्यापही कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) • आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी ११ मे २०१८ रोजी केलेल्या पहाणीत म्हात्रे पुल ते राजाराम पुल येथे नदीपात्रालगत अनधिकृत बांधकामे असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) • पुणे महानगरपालिका व पाटबंधारे विभागाने संयुक्त पहाणी करून निषेधक पुररेषा (ब्ल्यू लाईन) ते नदीपात्र यामधील बांधकामाचे सर्वेक्षण केले.
• निषेधक पुररेषा (ब्ल्यू लाईन) व नदीपात्र यामधील अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली आहेत.
• तसेच ब्ल्यू लाईन नंतरच्या रेड लाईन व तद्नंतरच्या क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामांना पुणे महानगरपालिकेमार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याबाबत संबंधीतांनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणांवर न्यायालयाच्या आदेशानुसारची “जैसे थे” परिस्थिती उठविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकृषिक परवाने देताना शासनास भरावयाचे अधिमुल्य ३० टक्यावरून कमी करून ५ टक्के करण्याबाबत

**(५४) * १२०६७४ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावाच्या किंवा शहराच्या हद्दीपासून ठराविक अंतरावरील शेती, शेती ना-विकास, वनीकरण अशा झोनमधील संभाव्य बिनशेती जमिनी यांना अकृषिक अथवा रहिवासी झोन म्हणून मान्यता देताना वापरकर्त्यास शासनाला चालू रेडीरेकनरच्या ३० टक्के दराने अधिमुल्य रक्कम द्यावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रादेशिक योजनांमध्ये शेती तथा नाविकास विभाग या वापर विभागामध्ये गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापरासाठी पूर्वीच्या मंजूर प्रादेशिक योजनांमध्ये अधिमुल्य आकारणी दर ३० % आहे. तथापि नवीन मंजूर / सुधारित झालेल्या प्रादेशिक योजनातील विनियमात हा अधिमुल्य दर कमी करुन १५% करण्यात आलेला आहे. अधिमुल्य आकारणी राज्यातील सर्व प्रादेशिक योजनेमध्ये एक सारखी असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी वाढणाऱ्या रेडीरेकनरच्या दरामुळे ३० टक्के अधिमुल्याच्या रक्कमेतसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने घरांच्या तसेच जागेच्या किंमतीमध्ये वाढ होवून त्याचा भार सामान्य नागरिकांवर येत असल्याने शासनास भरावयाचे अधिमुल्य ३० टक्यावरून कमी करून ५ टक्के करण्याबाबतची लेखी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार शासनास भरावयाचे अधिमुल्य ३० टक्यावरून कमी करून ५ टक्के करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
शासनाने राज्यातील, मंजूर प्रादेशिक योजना १) पुणे प्रदेश २) कोल्हापूर - इचलकरंजी प्रदेश ३) सांगली-मिरज प्रदेश ४) सोलापूर जिल्हा प्रदेश ५) नागपूर प्रदेश ६) चंद्रपूर-बल्लारपूर प्रदेश ७) नाशिक प्रदेश ८)अहमदनगर प्रदेश ९) जळगांव-भूसावळ प्रदेश १०) औरगांबाद-जालना प्रदेश ११) औरगांबाद प्रदेश १२) अमरावती प्रदेश १३) अकोला-वाशिम प्रदेश १४) रत्नागिरी -सिंधुदूर्ग प्रदेश १५) रायगड प्रदेश १६) मुंबई महानगर प्रदेश करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शेती तथा नाविकास विभाग या वापर विभागामध्ये गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापरासाठी अधिमुल्य आकारणीसंदर्भाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नवीन विनियम अंतर्भूत केला आहे. त्यानुसार ३०% अधिमुल्य आकारणी करावयाची आहे.

शासनाने दि.०१.०१.२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्यातील ११ द्रुतगती प्रादेशिक योजनांना मंजूरी दिलेली आहे. तसेच, जानेवारी, २०१७ मध्ये कोल्हापूर तसे सातारा जिल्हयाची सुधारित प्रादेशिक योजना मंजूर केलेली आहे. या शासननिर्णयानुसार शेती तथा नाविकास विभाग या वापर विभागामध्ये गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापरासाठी १५% अधिमुल्य आकारणी करावयाची आहे.

(३) होय.

(४), (५) व (६) राज्यातील प्रादेशिक योजनांमध्ये शेती तथा नाविकास विभाग या वापर विभागामध्ये गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापरासाठी पूर्वीच्या मंजूर प्रादेशिक योजनांमध्ये अधिमुल्य आकारणी दर ३०% आहे. तथापि नवीन मंजूर / सुधारित झालेल्या प्रादेशिक योजनातील विनियमात हा अधिमुल्य दर कमी करुन १५% करण्यात आलेला आहे. आता राज्यातील सर्व प्रादेशिक योजनांमध्ये ५% अधिमूल्य आकारणी करणेची विनंती प्राप्त असून ही बाब धोरणात्मक स्वरूपाची आहे. सबब, याप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील कचरा उचलण्यासाठी ठेका दिलेल्या कंपनीने निविदेतील अटी व शर्थीचा भंग केल्याबाबत

**(५५) * ११७६२६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील कचरा उचलण्यासाठी ठेका दिलेल्या कंपनीने निविदेतील अटी व शर्थीचा भंग केल्याने अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदशर्नास आले व तद्नुसार अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील कचरा उचलण्याचा ठेका घेणाऱ्या कंपनीवर व त्यास जबाबदार नगरपरिषद प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

संबंधित कंत्राटदारामार्फत अंबरनाथ शहरात निर्माण होणाऱ्या सर्व कचऱ्याचे संकलन व वाहतुक घंटागाडीद्वारे घरोघरी जाऊन करण्यात येते. सदर संकलीत केलेला कचरा क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो.

• कंत्राटदाराकडून नियमीतपणे कचरा उचलण्यात येत असल्याने नगरपरिषद हद्दीत कचऱ्याचे साम्राज्य व त्यानुषंगाने होणारे आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले नाहीत, असे अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) तथापि, यासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका येथील २७ गावांमध्ये पाण्याची अवैध नळजोडणी करुन होत असलेली पाणी चोरी

**(५६) * ११६६६२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका येथील २७ गावांना पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होत नसल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७ गावांमध्ये पाण्याची समस्या असतांना तेथे पाण्याची अवैध नळजोडणी करून पाणी चोरण्यात येत असल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध नळजोडणी असल्याने २५ दशलक्ष लि. पाण्याची चोरी होत असल्याने महानगरपालिकेचे नुकसान होत असून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी वारंवार स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था, संघटना यांचेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या २७ गावाअंतर्गत प्रभाग क्र. ११२ मध्ये अनियमित व अपुऱ्या दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने तेथील नगरसेविकेने बेमुदत उपोषण करण्याबाबत दि.०४.०४.२०१८ रोजी महानगरपालिका प्रशासनास निवेदन दिले, हे खरे आहे.

(२) २७ गावांमध्ये अवैध नळजोडणी करून पाणी चोरण्यात येत असल्याबाबत स्थानिक नगरसेवक तसेच नागरिकांकडून महानगरपालिकेकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) अवैध नळजोडणी विरोधात कारवाई करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नगरसेविका तसेच नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे.

(४) • या २७ गावांकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ४३ नळजोडण्यांद्वारे साधारण ३५ द. ल. ली. पाणी पुरवठा करणेत येतो.

• सदर २७ गावांच्या अवैध नळजोडणी विरोधात प्राप्त तक्रारीस अनुसरून जानेवारी, २०१८ पासून सुमारे १४९ नळजोडण्या खंडीत करण्यात आल्या असून १३८ अवैध नळजोडण्या अडीचपट दराने पाणीपट्टी आकारून मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

• केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २७ गावांसाठी रू.१८०.८१ कोटी किंमतीची पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे.

• सदर योजनेमध्ये २१ कि.मी. उर्ध्ववाहिनी, १७ कि.मी. लांबीची गुरूत्ववाहिनी, २८ जलकुंभ व २२३ कि.मी. वितरण व्यवस्थेचा प्रामुख्याने समावेश आहे.

• सदर प्रकल्पाची निविदा अंतिम टप्प्यामध्ये आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरात झालेल्या शिष्यवृत्ती गैरव्यवहाराबाबत

**(५७) * १२२४०१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील आदिवासी वसतीगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थीनींना सन २०१२-१३ मध्ये राधानगर परिसरातील फुलवंताबाई इंस्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर इनफॉर्मेशन या संस्थेमध्ये डिप्लोमा इन वेब डिझाईनला प्रवेश

देऊन त्यांच्या शैक्षणिक कागदपत्राच्या आधारावर शिष्यवृती हडपण्याचा प्रकार दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात फसवणुक झालेल्या विद्यार्थीनींनी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास गाडगेनगर पोलीस स्टेशन अमरावती येथे तक्रार देऊन शिष्यवृत्ती हडपण्यात आलेल्या ५८ विद्यार्थ्यांची यादी पोलीसांकडे सोपवली असल्याचे निदर्शनास आले असून पोलीस आयुक्त अमरावती यांनी सदर प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्याचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहार करण्याऱ्या संस्थेच्या संचालक, अध्यक्ष व अन्य पदाधिकारी आणि आदीवासी प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, गाडगेनगर, अमरावती शहर येथे अप.नं. ३६७/१८ भादंविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याबाबत

**(५८) * ११८८५७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर काही गिरणी मालकांनी एक तृतीयांश जमीन म्हाडा व मुंबई महानगरपालिकेला दिली पण सुमारे अकरा गिरणी मालकांनी एक इंचही जमीन गिरणी कामगारांच्या घरासाठी दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गिरणी मालकांनी महानगरपालिका अधिका-यांच्या संगनमताने गिरण्याच्या जमिनीवर इमारती उभारल्या, कामगारांचे हक्क डावलून गिरण्याच्या मालकांनी गिरण्यांचे भूखंड हस्तगत केले, मुंबईतील चार गिरण्यांमध्ये संयुक्त भागीदारी योजनेअंतर्गत ६ हजार बेरोजगारांना रोजगार उपलध करुन देण्यात येणार होता पण त्याचाही दुरुपयोग केला असून इतर व्यवसाय समितीने मुख्य सचिवांची माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर करुन या संपूर्ण प्रकणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण ५८ गिरण्यांचा समावेश आहे. त्यातील ११ गिरण्यांच्या संदर्भात पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर नाही. सदर अकरा गिरण्यांपैकी ९ कापड गिरण्या ह्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या असून त्यापैकी युनायटेड मिल नं.६ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक प्रस्तावित आहे. सदर जागा स्मारकासाठी आरक्षित झालेली आहे. राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाकडील गिरण्यांचा विचार करता म्हाडाला देय असलेली जागा महामंडळाकडून इंडीया युनाटेड मिल नं.४ मध्ये देण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचा प्रस्ताव महापालिकेकडे कार्यवाहीमध्ये आहे. उर्वरित २ कापड गिरण्या ब्रॅडबरी व रधुवंशी ह्या खाजगी मिलचे प्रस्ताव महापालिकेस प्राप्त झालेले नाहीत.

वर नमूद केलेल्या ११ कापड गिरण्यांमधून गिरणी कामगारांच्या घरासाठी जमिन अद्याप देण्यात आलेली नाही.

यापूर्वी राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाने इतर मिलमध्ये जागा दिली आहे.

-----------------

## मुंबई येथे म्हाडा सोडतीची खोटी माहिती संकेतस्थळावरुन देऊन केलेली फसवणूक

**(५९) * ११७०३७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे सन २०१८ मध्ये म्हाडा सोडतीची खोटी माहिती संकेतस्थळावरुन देऊन फसवणुक केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वांद्रे, कुर्ला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सायबर पोलीस ठाणे वांद्रे, कुर्ला गुन्हेशाखा विभागाकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये गिरणी कामगारांच्या सोडतीबाबतही अन्य २५ संकेतस्थळावरुन खोटी तसेच दिशाभुल करणारी माहीती देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी एकुण २५ बोगस संकेतस्थळे कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सन २०१८ मध्ये म्हाडा सोडतीची खोटी माहिती संकेतस्थळावर दिल्याबाबत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या खेरवाडी पोलीस ठाणेत गु.र.क्र.१६५/२०१८, कलम-४१७, ४१९, ४२०, ५११

भादंवि सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६(ड) अन्वये नोंद करण्यात आला आहे.

(३) म्हाडा सोडती संबंधात तयार करण्यात आलेल्या २६ बनावट संकेत स्थळावर गिरणी कामगारांच्या सोडतीबाबत खोटी व दिशाभुल करणारी माहिती देण्यात आली किंवा कसे याबाबत तपास करण्यात येत आहे.

(४) होय हे खरे आहे, म्हाडा २०१८ सोडती संबंधात एकुण २६ बोगस संकेतस्थळे कार्यरत आहे. असे निदर्शनास आले आहे.

(५) बनावट संकेत स्थळाची माहिती मिळणे कामी मुख्य तांत्रिक अधिकारी, ZNet technologies private limited या कंपनीशी पत्र व्यवहार करण्यात आला आहे. तसेच सायबर पोलीस ठाणेकडे इतर बनावट वेबसाईटची माहिति मिळण्याबाबत संबंधित तांत्रिक विभागाशी पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

(६) प्रश्न  उद्‌भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात विविध पदावर कंत्राटी पध्दतीवर काम करणा-या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरण्यात आली नसल्याबाबत

**(६०) * ११८५१४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रशासनातील काही अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे प्राधिकारणात विविध पदावर जवळपास १० ते १२ वर्षापासून कंत्राटी पध्दतीवर काम करणा-या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरण्यात आली नसल्याची बाब दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी हलगर्जी करणा-या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मार्च १९९७ ते फेब्रूवारी २०१३ या कालावधीसाठी भविष्य निर्वाह निधी वर्गणी संदर्भात प्राधिकरणाच्या हिश्याची रक्कम रु.५०.६५ लाख EPF कार्यालयाकडे भरण्यात आलेली आहे. सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हिश्याची रक्कम कर्मचाऱ्यांकडून भरणे बाकी आहे.

(२) व (३) या संदर्भात EPF कार्यालयाचे दि.३०.०१.२०१८ रोजीच्या आदेशान्वये कर्मचाऱ्यांच्या हिश्याची रक्कम प्राधिकरणाने भरावी असे आदेश पारीत केलेले आहे. त्याविरुध्द कायदेशीर बाबी तपासून मा.न्यायालयाकडे दाद मागण्याचे प्रस्तावित असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

-----------------

## म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाच्या महत्वाच्या फायली असलेल्या शील कंपनीच्या इमारतीला लागलेली आग

**(६१) * ११६९८० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाचे (एसआरए) १८ हजार महत्वाच्या फायली सुरक्षित ठेवण्याकरिता नवी मुंबईतील महापेमध्ये

असणाऱ्या शील कंपनीसोबत करार करण्यात आला होता व या कंपनीतील ४ नंबरच्या डिपार्टमेंटमध्ये या सर्व फायली सुरक्षित ठेवण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीला माहे डिसेंबर, २०१७ मध्ये भीषण आग लागून या आगीत सर्व फायली जळून खाक झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शील कंपनीतील ४ नंबरच्या डिपार्टमेंटमध्ये लागलेल्या आगीत म्हाडाच्या ज्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये घोटाळे आणि गैरप्रकार घडले आहेत ज्यांची चौकशी लाचलुचपत खात्याकडून सुरु आहे त्यासंदर्भातील फायली नष्ट झाल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त १८ हजार महत्वाच्या फायली सुरक्षित ठेवण्यास हलगर्जीपणा करणा-या शील कंपनीची चौकशी करण्याची मागणी पोलीसांकडे म्हाडाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच सन २०१३ पासून म्हाडाने शील कंपनीला स्कॅनिंगचे काम दिले असून म्हाडाच्या मुंबई मंडळाने स्कॅनिंगला पाठवलेल्या ५० टक्के फायली शील कंपनीमध्ये पाण्यात भिजल्याने खराब झाल्या आहेत व कागदपत्रामधील मजकुरच वाचता येत नाही. मात्र या कामासाठी शील कंपनीला म्हाडा महिन्याला लाखो रूपये मोजत असून स्कॅन केलेल्या फायलीमधील एका प्रतिला ५०० रूपये आकारण्यात येत असल्याची गंभीर बाब दिनांक ०४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शील कंपनी विरूध्द तसेच म्हाडाच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) म्हाडा व शील प्रोजेक्ट लि. यांच्याशी दि.१२.१०.२०१२ रोजी झालेल्या करारनाम्यानुसार म्हाडाच्या ५,३४,४७६ नस्त्या सदरहू शील कंपनीकडे जतन करण्यासाठी ठेवल्या होत्या. त्यापैकी १७,९९० नस्त्या दि.१९.१२.२०१७ रोजी लागलेल्या आगीत जळाल्या असून ४,७४९ फाईल्स पाण्याने भिजलेल्या आहेत. तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या नस्त्या सदर कंपनीकडे ठेवण्यात आलेल्या नाहीत.

सबब, आगीमध्ये सर्व फाईल्स जळाल्याची बाब खरी नाही.

उक्त सर्व संचिकांची स्कॅन कॉपी सर्व्हर वर उपलब्ध आहे. जळालेल्या व भिजलेल्या नस्त्यांची दुय्यम प्रत शील कंपनीच्या खर्चाने तयार करुन देण्याबाबत म्हाडाने कंपनीस कळविले असून चार महिन्यात सदरच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे कंपनीने मान्य केले आहे. त्यामुळे ज्या प्रकरणांत घोटाळे आणि गैरप्रकार घडलेले आहेत त्याबाबतच्या चौकशीवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही.

(४) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे तक्रार नोंदविली आहे.

(५) शील कंपनी यांचेसोबत झालेल्या करारानाम्यानुसार ५ लाख व त्यापेक्षा जास्त पृष्ठ साठविण्यासाठी ५ पैसे प्रति पृष्ठ प्रती महिना असा दर ठरविण्यात आला आहे. त्यानुसार मागील वर्षी रु.१,५५,४५,४७७.२८/- भाडे अदा करण्यात आले आहे.

त्यामुळे स्कॅन केलेल्या संचिकेमधील एका प्रतिला ५०० रुपये मोजावे लागतात, ही बाब खरी नाही.

(६) व (७) याबाबत शील कंपनीस दि.११.१२.२०१७ रोजी आग लागल्याचे समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

-----------------

## खेड, चिपळूण व गुहागर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) खाडीकिनारी नागरी वस्तीला बंदर जेट्टीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ते नसल्याने नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(६२) * ११७६९७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे होडखाड-भोईवाडी जेट्टी, आमशेत मोहल्ला जेट्टी, आयनी रेल्वेस्टेशन ते तुंबाड जेट्टी (ता.खेड), चिवेली लोणारी बंदर (ता.चिपळूण) आणि पडवे माड जेट्टी (ता.गुहागर) येथील नागरी वस्तीला जेट्टीवरूनच प्रवास किंवा ये-जा करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नागरी वस्तीपासून जेट्टीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ते नसल्याने नागरिकांची दळणवळणाची मोठी समस्या निर्माण होते तसेच त्यांना लांब पल्ल्याच्या मार्गाने वाजवीपेक्षा जादा पैसे मोजून जेट्टीपर्यंत पोहचावे लागते व शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी नागरी वस्ती ते थेट जेट्टींना जोडणाऱ्या जोडरस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आणि त्यानंतर सतत शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) होडखाड-भोईवाडी येथील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पडवे माड जेट्टी व तुंबाड जेट्टीकडील जोडरस्त्यांची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्वनिधीतून हाती घेण्यात आली असून निविदा स्तरावर आहेत. आमशेत मोहल्ला जेट्टी, चिवेली बंदर जेट्टी व आयनी रेल्वे स्टेशन येथील रस्त्यांची कामे नियोजन स्तरावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतून राज्यातील युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी बांधलेल्या १७ इमारती कौशल्य विकास विभागाने ताब्यात न घेतल्याबाबत

**(६३) * ११६५९२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन**

**सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतून देशातील २२ कोटी युवकांना तंत्र व कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार सक्षम करण्याची घोषणा केली तथापि त्यासाठी बांधून तयार असलेल्या राज्यातील १७ इमारती कौशल्य विकास विभागाने गत पाच वर्षात ताब्यात घेतल्या नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नव्या इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कौशल्य विकास विभागाने न घेता दुसरीकडे भाड्याच्या इमारतीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (आयटीआय) केंद्र सुरु करून भाड्यापोटी वर्षाला रुपये २५ लाखांची रक्कम खर्च करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधण्यात आलेल्या १७ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र नाही, नळ जोडणी व वीज नाही, रस्ता व पथदिवे नसुन सायकल तळ नाही अशी कारणे दाखवून कौशल्य विकास विभाग इमारतींचा ताबा घेण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे सदर इमारतींमध्ये अतिक्रमण होणे, नासधुस होणे, भिंती पोखरल्या जाणे अशा प्रकारे दुरवस्था होऊन वापराविना मोडकळीस आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या इमारतींच्या बांधकामावर झालेला रुपये ६४ कोटींचा खर्च वाया गेला असून, भाड्याच्या इमारतीत औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे (आयटीआय) चे वर्ग सुरु ठेवून कौशल्य विकास विभागाने शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषीं असलेल्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच इमारती ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गतच्या एकूण १७ संस्थांच्या इमारतींपैकी एकूण ७ संस्थांचे हस्तांतरण झालेले आहे. त्यातील १ संस्थेचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे व इतर ६ संस्थांचे भोगवटा प्रमाणपत्राशिवाय हस्तांतरण झाले आहे. उर्वरीत १० संस्थांची बांधकामे अद्याप पूर्ण झाले नसल्याने त्यांचा ताबा घेण्यात आलेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर संस्थांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व आवश्यक अभिलेख प्राप्त झाल्यावर इमारतींचा ताबा घेण्यात येईल.

(२) सदर इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले नसल्यामुळे, ०१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ०१ शासकीय तांत्रिक विद्यालय अशा ०२ संस्था भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत असून या संस्थांकरिता भाड्यापोटी रूपये ३,८९,०२८/- इतका वार्षिक खर्च होत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रश्नात उल्लेखित केल्याप्रमाणे काही ठिकाणी सायकल स्टॅण्ड, अंतर्गत रस्ता, नळ जोडणी/पाण्याची सोय, वीज जोडणी/विद्युतीकरण व स्ट्रीट लाईट हया आवश्यक सोयीसुविधांची पूर्तता सार्वजनिक बांधकाम विभागाने न केल्यामुळे व पर्यायाने इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निर्गमित न होऊ शकल्यामुळे इमारतीचा ताबा घेणे आवश्यक असूनही घेता येत नाही.

(४) बांधकाम पूर्ण असलेल्या एकूण १७ शासकीय संस्थांपैकी १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ०३ वसतीगृह व ०२ शासकीय तांत्रिक विद्यालये यांच्या बांधकामांसाठी एकूण रूपये ८०५९.२१ लक्ष रक्कम खर्च झाली असून त्यापैकी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगांव जामोद ही संस्था स्वत:च्या इमारतीत स्थलांतरीत झाली असून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. ०६ संस्था स्वत:च्या इमारतीत आहेत, परंतू अद्याप त्यांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. ०५ संस्था या विभागाच्या इतर शासकीय संस्थेमध्ये कार्यरत आहेत. उर्वरीत ०१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ०१ शासकीय तांत्रिक विद्यालय अशा ०२ संस्था भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत असून या संस्थांकरिता भाड्यापोटी रूपये ३,८९,०२८/- इतका वार्षिक खर्च होत आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वानगाव वसतीगृह, वाडा वसतीगृह,पेण

वसतीगृह ह्या ३ संस्थांच्या इमारतीतील काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने अपूर्ण ठेवल्याने व आवश्यक ते अभिलेख उपलब्ध न करून दिल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संस्थेच्या इमारती अद्याप या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नाहीत.
(५) सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर संस्थाच्या इमारतीची कामे अपूर्ण ठेवल्याने व आवश्यक ते अभिलेख उपलब्ध न करून दिल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संस्थेच्या इमारती या विभागाकडे हस्तांतरीत होण्यास विलंब झालेला आहे.सदर संस्थांच्या इमारतीची कामे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाल्यानंतर आणि भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर या इमारतींचा ताबा घेण्यात येईल.सदर प्रकरणी याप्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा नगरपरिषद अंतर्गत विद्यूत विभागामध्ये एल.ई.डी लाईट खरेदी प्रकरणी झालेला गैरव्यवहार

**(६४) * ११९२६५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा नगरपरिषद अंतर्गत विद्यूत विभागामध्ये एल.ई.डी लाईट खरेदी प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत स्थानिक नगरसेवकांनी दिनांक १ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे केलेली तक्रार शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. त्या प्रकरणी श्री. आकाश विजय दळवी, नगरसेवक व इतर नागरिक यांची दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८

रोजीची तक्रार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिनांक १ मार्च, २०१८ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, खामगाव, जि.बुलढाणा यांना चौकशी करण्यास सांगितले असून चौकशीची प्रक्रिया चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक परिक्षेत्रात अवैध शस्त्रात्रे आढळल्याबाबत

**(६५) * ११८३४८ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक परिक्षेत्रातील पाच जिल्ह्यांमधील जळगावात सर्वाधिक तर त्या खालोखाल अहमदनगरमध्ये अवैध शस्त्रात्रे पोलीसांच्या हाती लागल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक परिक्षेत्रात दिनांक ३ ते १४ मे, २०१८ रोजीपर्यंत अवघ्या १२ दिवसांत केलेल्या कारवाईत एकुण ९४ गावठी कट्ट्यासह घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिक्षेत्रातील पाच जिल्ह्यांमधुन १० पिस्तुल व १९ गावठीकट्ट्यासह ९३ अवैध हत्यारे हस्तगत केली गेली तसेच या जिल्ह्यांमध्ये गावठी कट्टे व पिस्तुल १५ ते ४० हजार रुपयांना सर्रास विक्री केले जात असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मु.पो. ता.चांदवड (जि.नाशिक) येथे पोलीसांनी एका बोलेरो गाडी क्र.एमएच ०१ एसए ७४६० या गाडीचा क्रमांक वापरुन बेकायदा शस्त्रांची वाहतूक करीत असताना, अवैध शस्त्रे, बोलेरो व चार व्यक्तींना अटक

केल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार बेकायदा शस्त्रांचा व्यापार करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर व्यापार रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) नाशिक परिक्षेत्रातील पाचही घटकांमध्ये अवैध शस्त्रे/अग्नीशस्त्रांबाबत मे महिन्यात राबविलेल्या विशेष मोहीमेमध्ये दि.३/५/२०१८ ते दि.२५/५/२०१८ या कालावधीत अहमदनगर येथे एकूण ७ गावठी कट्टे, ७ देशी बनावट पिस्टल व इतर घातक शस्त्रे जप्त केलेले आहेत. तसेच जळगांव येथे एकूण ५ पिस्टल, ५ गावठी कट्टे व इतर घातक शस्त्रे जप्त करण्याची कारवाई केलेली आहे.

(२) व (३) सदर कारवाईमध्ये नाशिक परिक्षेत्रात दिनांक ३ मे ते १४ मे, २०१८ रोजीपर्यंत १२ दिवसात एकूण १० पिस्टल, १९ कट्टे व इतर घातक शस्त्रे (तलवार, कोयते, चॉपर, चाकु, सुरे, कटर, कुऱ्हाड, गुप्ती) जप्त करण्याची कार्यवाही झालेली आहे.

नाशिक परिक्षेत्रीय पाचही घटकांमध्ये गावठी कट्टे व पिस्तुल १५ ते ४० हजार रुपयांना सर्रास विक्री केले जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

मोहीमे दरम्यान केलेल्या कारवाई अंतर्गत दाखल गुन्हे ही अवैध शस्त्रे कब्जात बाळगतांना मिळून आल्यामुळे दाखल झालेली आहेत. तसेच काही गुन्ह्यांमध्ये अवैध अग्नीशस्त्रे ही विक्रीच्या उद्देशाने कब्जात बाळगतांना मिळून आलेली आहेत.

(४) व (५) हे खरे आहे.

दि. १४/१२/२०१७ रोजी मुंबई-महामार्ग क्र.३ रोडवरील मंगरुळ टोलनाक्यावर आरोपींकडून अवैध शस्त्रसाठा त्यात एकूण २५ लहान मोठ्या रायफल, पंप ॲक्शन मशिनगन व १९ रिव्हॉल्वर असे एकूण ४४ अग्नीशस्त्रे व त्यांचा वेगवेगळा दारुगोळा एकूण ४१४० जिवंत काडतुसे याप्रमाणे एकूण

१२,३७,७००/- रुपये किंमतीचे अग्नीशस्त्रे व दारुगोळा तसेच चिजवस्तु, बोलेरो गाडीत व रोख रक्कमेसह बेकायदेशीरपणे मिळवून सदरचा अवैध शस्त्रसाठा बेकायदेशीररित्या कब्जात बाळगुन बोलेरो गाडीतुन घेवून जातांना मिळून आले म्हणुन चांदवड पो.स्टे.ला. दि.१५/१२/२०१७ रोजी गु.र.नं.३०६४/२०१७, भारतीय हत्यार कायदा कलम ३ व ७ चे उल्लंघन २५ सह भा.दं.वि.कलम ३५३, ४६८, ४८३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांनी सदर गुन्ह्यास क्र. NR/११६/MCOCA/३६५/२०१७, दि. २७/१२/१७ अन्वये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२) व ३(४) अन्वये गुन्ह्याचा तपास करण्याची परवानगी दिली. सदर गुन्ह्याचा सखोल तपास करुन गुन्ह्यातील एकूण ८ आरोपींविरुध्द दि.११/६/२०१८ रोजी दोषारोप पत्र सादर केले आहे. या ८ आरोपींपैकी ७ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. १ आरोपी हा विधीसंघर्षीत बालक असून तो सद्यस्थितीत बालसुधारगृहात आहे.

अवैध शस्त्रांना प्रतिबंध होणेकरीता ठोस कारवाई करण्याबाबत परिक्षेत्रातील सर्व घटक प्रमुखांना सुचना दिलेल्या आहेत. जिल्हयातील प्रत्येक मार्गावर दरोडा गस्त पेट्रोलींग व नाकाबंदी करण्यात येत आहे. जिल्हयाचे सरहद्दीवर चेकपोस्ट् उभारण्यात आलेले असून वेळोवेळी जिल्ह्यांमध्ये ऑल आऊट स्किम व कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात येते.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## नागपूर शहरात १३२८ इमारती अनधिकृत असल्याबाबत

**(६६) * १२१५२९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) क्षेत्राचा नियोजनबध्द विकास व्हावा यासाठी विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्षेत्रात गतकाळात कोणत्याही स्वरूपाची परवानगी न घेता बांधकाम करण्यात आलेल्या १३२८ इमारतींना अनधिकृत घोषित करण्यात आले असल्याची माहिती दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुमती न घेता बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींमध्ये ११५ औघोगिक संस्था, ७५ शैक्षणिक संस्था, ६५ बहुमजली इमारत, ५२ रेस्टारेंट, ८८४ निवासी तसेच अन्य बांधकामाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, या अवैध बांधकामा विरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

शासन नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४१६/ प्र.क्र.१२२(अ)/२०१६/नवि-९, दि. ०५/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) च्या तरतुदीनुसार नागपूर महानगर क्षेत्राची विकास योजना शासनाने मंजुर केलेली आहे व वगळलेल्या क्षेत्रासाठी पुन्हा प्रसिध्द केलेली आहे.
(२) व (३) होय.
(४) अनधिकृत बांधकामावर कार्यवाही ही त्या त्या नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये करणे अभिप्रेत आहेत. या क्षेत्रासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहेत.

१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ खाली अनधिकृत इमारत बांधकामांना एकुण १४६८ नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. यात प्रश्न क्र.२ मधील १३२८ इमारतीचा समावेश आहे.

२) शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१४/प्र.क्र.८२/१४/ नियम/नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२(क) अनुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये नियम प्रसिध्द केलेले असून सदरचे नियम हे दि. ३१/१२/२०१५ पूर्वीच्या बांधकामासाठी लागू आहेत. अनधिकृत बांधकाम नोटीसच्या अनुषंगाने अर्जदार यांना कलम ४४ अन्वये नियोजन प्राधिकरणाकडे बांधकाम नियमानुकुल करण्याबाबतचा प्रस्ताव दाखल करता येऊ शकतो. म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये दि. ३१/१२/२०१५ पूर्वीच्या विना मंजुरीची भूखंड/अभिन्यास /बांधकामे प्रशमन संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि. ३१/१०/२०१८ पर्यत आहे.

(३) अनधिकृत बांधकामाची नोटीस देण्यात आलेल्या एकुण ३१० भूखंड धारकांनी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदरचे प्रस्ताव छाननी प्रक्रियेत आहेत. दि. ३१/१०/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिल्यानुसार अर्ज स्विकारणे सुरु आहे.

(४) आतापर्यंत प्रशमित संरचना अंतर्गत एकुण ३८९५ अर्ज नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झालेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील नवदुर्गा सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील १७ रहिवाशी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे बेघर झाल्याबाबत

**(६७) * १२२९७९ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील नवदुर्गा सहकारी संस्थेच्या न. भू.मा. क्र. ४८९, ४८९/१ ते १५ या जागेवरील १७ झोपडीधारकांना संक्रमण शिबिरातील सदनिका खाली करून उपजिल्हाधिकारी (अति./निष्का) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने परत ना-दुरुस्त घरांमध्ये राहण्याचे आदेश दिले असता त्या ना-

दुरुस्त झोपड्या प्राधिकरणाने अथवा विकासकामार्फत निवासयोग्य स्थितीत करण्याचे आश्वासन मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत प्राधिकरण अथवा विकासकामार्फत सदर ना-दुरुस्त झोपड्यांची दुरुस्ती करून आश्वासन पूर्तता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झोपड्पट्टीधारकांना १० वर्ष रिक्त असलेल्या जुन्या, ना-दुरुस्त व ५ फूट खोल असल्यामुळे पावसाळ्यामध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने मालमत्तेस व जीवितास हानिकारक असलेल्या घरात नागरिकांना राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राधिकरण अथवा विकासकाने सदर झोपड्यांची दुरुस्ती करून न दिल्यामुळे झोपडीधारकांनी नाईलाजास्तव स्वखर्चाने दुरुस्तीकरीता उप-जिल्हाधिकारी (अति./निष्का) व महानगरपालिका सहायक आयुक्त, के/पूर्व यांच्याकडे परवानगी मागितली असता परवानगी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राधिकरण अथवा विकासकामार्फत सदर झोपड्यांची दुरुस्ती करून घेण्याबाबत किंवा स्वखर्चाने दुरुस्ती करीता उपजिल्हाधिकारी (अति./निष्का) व महानगरपालिका सहायक आयुक्त, के/पूर्व यांच्याकडून परवानगी देण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) प्राधिकरणाने संबंधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली असून सदर झोपडीधारकांच्या झोपड्या निवासयोग्य करण्यासाठी शासन निर्णय दि.११.०७.२००१ व दि. ०५.०६.२००२ च्या तरतुदींच्या अधिन दुरुस्तीस झोपडीधारकांना परवानगी देणेबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची हरकत नसल्याचे प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेनीबुद्रक तरीबंदर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील जेट्टीची दुरवस्था झाल्याबाबत

**(६८) * १२३३५४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेनीबुद्रक तरीबंदर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथे शासनाकडून काही वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या जेट्टीची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे होडीतून ग्रामस्थांना प्रवास करणे धोक्याचे असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्राला भरती येते त्यावेळी भरतीचे पाणी तरीबंदर येथे मोठ्या प्रमाणात शिरत असल्याने ग्रामस्थांना जीव मुठीत धरुनच प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांच्या सुरक्षेतेच्या व दक्षतेच्या दृष्टीने जेट्टीची तात्काळ दुरूस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर जेट्टीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

बेनीबुद्रक तरीबंदर जेट्टीचे बांधकाम सन २००९-२०१० मध्ये करण्यात आले असून आजमितीस जेट्टी सुस्थितीत आहे. बेनीबुद्रक जेट्टी दुरुस्तीबाबत ग्रामस्थांकडून कोणतीही मागणी शासनास प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केडगांव नगरमध्ये (अहमदनगर) शाहुनगर भागातील मिलींद सोसायटीत झालेली हत्या

**(६९) * ११९५५२ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत**

**गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केडगांव नगरमध्ये (अहमदनगर) शाहुनगर भागातील मिलींद सोसायटीत शिवसेनेचे उपशहरप्रमुख व शिवसैनिक यांची दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास गोळ्या घालुन हत्या करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांनी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार आतापर्यंत किती आरोपींना अटक केली आहे, त्यांची नावे काय आहेत व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. सदर प्रकरणी कोतवाली पो.स्टे. अहमदनगर गु.र.नं. १३६/२०१८, भादंवि कलम ३०२, ३०३, १२० (ब), १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ सह आर्म ॲक्ट कलम ३, ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १) संदिप रामचंद्र गुंजाळ, २) बाळासाहेब एकनाथ कोतकर, ३) भानुदास महादेव कोतकर, ४) संग्राम अरुण जगताप, ५) बाबासाहेब विठ्ठल केदार, ६) संदिप उर्फ जॉन्टी बाळासाहेब गिऱ्हे, ७) महावीर उर्फ पप्पू रमेश मोकळे, ८) रवीन्द्र रमेश खोल्लम, ९) विशाल बाळासाहेब कोतकर व १०) भानूदास एकनाथ कोतकर या १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. वरील सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील हळद उत्पादक शेतक-यांची झालेली फसवणुक

**(७०) * ११९८८६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील हळद उत्पादक शेतक-यांना माहे मार्च, २०१६ ते डिसेंबर, २०१७ या काळात रुपये ३ कोटी ९१ लक्ष ९५ हजार ८०० एवढ्या रक्कमेची फसवणूक करणा-या व्यक्तींविरुध्द अमरावती शहरातील समरसपुरा, नांदगाव खंडेश्वर व कु-ही या तिन्ही पोलीस ठाण्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) समरसपुरा पोलीस ठाणे येथे अप.क्र.६१/१८ भादंवि कलम ४०६, ४२० व ३४ अन्वये चार आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

नांदगांव खंडेश्वर पोलीस ठाणे येथे अप.क्र. ७३/१८ भादंवि कलम ४०६, ४२० व ३४ अन्वये चार आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

कुऱ्हा पोलीस ठाणे येथे अप.क्र.५३/१८ भादंवि कलम ४०६, ४२० व ३४ अन्वये तीन आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

या व्यतीरिक्त अमरावती आयुक्तालयामध्ये हळद व्यापाराच्या व्यवहारात फसवणूक झालेप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाणे येथे अप.क्र.३६८/१८ भादंवि कलम ४२० व ३४ अन्वये तीन आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना (स्थापत्य) विभागातील अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा केलेला अपहार

**(७१) * ११७१५० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना (स्थापत्य) विभागातील अधिकाऱ्यांनी गाड्यांचे टायर, बॅटरीसह सुटे भाग बाजार भावापेक्षा पाचपट अधिक दराने खरेदी करुन कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महानगरपालिकेच्या दिनांक ०८/१२/२०१७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये महानगरपालिका सदस्यांनी, महानगरपालिकेच्या कारखाना विभागामार्फत दर करारानुसार विविध साहित्य खरेदीचे दर व त्यांचे प्रत्यक्ष बाजारभावानुसार असलेले दर यामधे तफावत असल्याचे निदर्शनास आणून दिले ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी ०५ अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द महानगरपालिकेमार्फत विभागीय चौकशी करण्यात येत असून, चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत महानगरपालिका स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे नागपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## नवी मुंबई मध्ये सिडकोने विकसीत केलेल्या वसाहतींना पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा म्हणून हेटवणे-कळंबोली ग्रीड प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत

**(७२) * १२०२७९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत सिडकोने विकसीत केलेल्या कळंबोली, खारघर, कामोठे, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, द्रोणागिरी, करंजाडे, तळोजा, उलवे वसाहतींना पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा म्हणून हेटवणे-कळंबोली ग्रीड प्रकल्पाला ५ वर्षे होवूनसुद्धा अद्यापही कामाला सुरूवात झाली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला जाऊन नागरिकांना २० एमएलडी पाणी मिळावे यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी पनवेल महानगरपालिकेकडे व मा.पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यादरम्यान तसेच यापूर्वी वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहतीत ६ लाखापेक्षा जास्त असलेल्या लोकसंख्येला पाणी पुरवठा करण्यासाठी सिडकोला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई महानगरपालिकेवर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे पाणी पुरवठा करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पाला रेल्वे महामार्ग व वन विभागाकडून परवानग्या न मिळाल्यामुळे सिडको प्राधिकरणाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नवी मुंबई महानगरपालिकेवर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडकोने विकसीत केलेल्या वसाहतींना सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा म्हणून हेटवणे-कळंबोली ग्रीड प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी २० द.ल.लि. पाणी मिळावे यासाठी लोकप्रतिनिधींची मागणी आहे. पनवेल महानगरपालिका व पनवेल तालुक्यातील नागरीकरण झालेल्या इतर भागाकरीता ठाणे जिल्हयाच्या धर्तीवर, पनवेल तालुक्यास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र जल प्राधिकरणाची नियुक्ती करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (पाणी पुरवठा) यांना दि.१४.३.२०१८ रोजी निवेदन दिले असल्याचेही आढळून येते.
(२), (३), (४) व (५) हेटवणे पाणीपुरवठा एम बी आर वहाळ ते कळंबोली व मुखत्वेकरुन विकसित होत असलेल्या विमानतळ पुनर्वसीत गावठाणे पुष्पक नगर, कामोठे व खारघर या प्रभागांसाठी असून सदरहू काम सन, २००९ पासून हाती घेण्यात आले आहे. उक्त प्रकल्पासाठी रेल्वे महामंडळाच्या परवानग्या प्राप्त झाल्या असून या कामासाठी आवश्यक असणाऱ्या इतर तत्सम वैधानिक मंजूऱ्या घेण्यात आल्या आहेत.

या कामांतर्गत एकूण १२.५ कि.मी. लांबीच्या जलवाहिनीपैकी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४-ब व राज्यमार्ग क्र.८१ लगत तसेच उर्वरित सिडको हद्दीमध्ये एकूण ९.२० कि.मी. लांबीची जलवाहिनी, गाढी नदीवरील पूल, रेल्वे रुळाखालील व राष्ट्रीय महामार्ग ४-ब खालील अनुक्रमे २ व ३ पुश थ्रु चे काम पूर्ण झाले आहे.

आजमितीस ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामासाठी केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाची मंजूरी घेण्याची कार्यवाही सुरु आहे. असे असले तरी, कामोठे विभागास एमआयडीसी च्या पाताळगंगा व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरवे पाणी पुरवठा योजनेतून ठोक स्वरुपात सिडकोमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, करंजाडे या सिडकोच्या विकसित वसाहतींसाठी सिडकोमार्फत पूर्वी पासूनच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच सिडको परिसरातील विकास व वाढती लोकसंख्या विचारात घेता भविष्यकालीन उपाय योजना म्हणून सिडकोमार्फत बाळगंगा, कोंढाणे या अन्य योजना प्रस्तावित केल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ट्विंकल एन्व्हायरो टेक लिमिटेड, रॉयल ट्विंकल स्टार क्लब आणि सिट्रस चेक्स लिमिटेड या कंपन्यांनी गुंतवणुकदारांची केलेली फसवणुक

**(७३) * ११६७३६ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ट्विंकल एन्व्हायरो टेक लिमिटेड, रॉयल ट्विंकल स्टार क्लब आणि सिट्रस चेक्स लिमिटेड या कंपन्यांचे मालक श्री.ओमप्रकाश गोयंका व संचालक यांनी मिळून मोठ्या प्रमाणात परताव्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रासह पाच राज्यांतील १२ लाख प्रतिनिधी आणि १८ लाख गुंतवणुकदारांची रुपये ७५०० कोटींची फसवणुक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंतवणुकीचा परतावा परत मागताना ठेवीदारांचे परतावे देण्याचे सदर कंपनीनी टाळाटाळ करून सर्व ठेवीदारांची फसवणूक केल्याने उक्त कंपन्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नाशिक जिल्ह्यातील लासलगाव परीसरातील सुशिक्षीत तरूणांना एजंटचे काम व मोठे कमिशन देऊन तर गुंतवणुकदारांना काही वर्षात गुंतवणुक केलेल्या रक्कमेवर मोठ्या प्रमाणात परतावा मिळेल असे आमिष दाखवित सिट्रस चेक इन्स व रॉयल ट्विंकल स्टार या कंपन्यांनी गुंतवणुकदारांची फसवणुक केल्याची बाब माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या

दरम्यान उघडकीस आली असून स्थानिक लोकप्रतिनीधीनी संबंधीत वित्तीय कंपन्यांच्या संचालकांवर गुन्हे नोंदवून गुंतवणुकदारांना ठेवी परत करण्याची मागणी नाशिक पोलीस आयुक्त यांचेकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंपनीचे अध्यक्ष श्री.ओमप्रकाश गोयंका व इतर प्रवर्तकांनी राज्यातील १८ लाख गुंतवणूकदारांची फसवणूक केली असून गोयंकाचे नातेवाईक आणि त्यांचे समर्थक व इतर ११८ पेक्षा जास्त कंपन्यांची मालमत्ता जप्त करावी तसेच एमपीआयडी कायद्यानुसार फसवणूक केल्याचे गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा होऊनही प्रशासनातर्फे कोणतीही कारवाई केली जात नसल्याची बाब दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार फसवणूक करणारे कंपनीचे मालक आणि संचालकांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आरोपी ओमप्रकाश गोयंका व संचालक यांनी मिळून जवळपास १८.५ लाख नागरिकांकडून गुंतवणूक स्विकारल्या असून सेबी अहवालानुसार ९ हजार कोटी पेक्षा जास्त रक्कम गोळा केली आहे. यामध्ये गुंतवणूकदारांची मुळ रु. ४,२५६ कोटी परतावा करणे बाकी आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

नाशिक जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधी डॉ.राहुल आहेर, वि.स.स. यांनी गुंतवणुकदारांना ठेवी परत करण्याबाबतची मागणी केलेली आणि त्यावर गुंतवणूकदारांच्या स्वाक्ष-या असलेले निवेदन पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचेकडे दि. २६.०४.२०१८ रोजी देण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी आरोपी कंपनीविरुध्द राज्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ नुसार फसवणूकीसंदर्भात एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) हे खरे नाही.
(६) सदर प्रकरणी चौकशी करुन ५ फौजदारी गुन्हे नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपी ओमप्रकाश बसंतलाल गोयंका यास अटक केली आहे. आरोपी कंपनी रॉयल ट्विंकल स्टार क्लब प्रा.लि. व सिट्रस लि. यांचे संचालकाच्या महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत ४७ स्थावर मालमत्ता संरक्षित करुन त्याबाबतची शासन अधिसूचना दिनांक ३१.५.२०१८ रोजी राजपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच आरोपी कंपनी व संचालक यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे.

आरोपी कंपनीच्या योजनेतील गुंतवणुकदारांनी मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल सिव्हील अपील क्र. २०९७१/२०१७ मध्ये दि. १०.०५.२०१८ रोजी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, शासनातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप अर्ज दाखल करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मीरा रोडच्या (जि.ठाणे) कनकिया भागात कांदळवनाची कत्तल होत असल्याबाबत

**(७४) * ११६५९४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा रोडच्या (जि.ठाणे) (मीरा-भाईंदर महानगरपालिका) कनकिया भागात कांदळवन, पाणथळ, ना विकास क्षेत्र व सीआरझेड बाधित असताना देखील कांदळवनाची बेसुमार कत्तल करुन मोठ्या प्रमाणात भराव टाकून भूखंड तयार करण्यात आल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवन सेलचे श्री. वासुदेवन यांनी पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याची गंभीर बाब स्पष्ट असताना देखील याकडे महानगरपालिकेने दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मीरा रोड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात येऊनही संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नैसर्गिक नाले, खाडी या ठिकाणी पावसाळी व भरतीचे पाणी साठविण्याची क्षमता असलेल्या क्षेत्रामध्ये सर्रास डेब्रिजचा भराव टाकून सपाटीकरण करून बेकायदा बांधकामे होत असल्याचेही माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाच्या तक्रारी महापालिका प्रशासनास प्राप्त झाल्या, ही वस्तुस्थिती आहे.

(२) • ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत वनशक्ती पब्लिक ट्रस्ट यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल केली.

• त्याअनुषंगाने श्री.वासुदेवन (सी.सी.ओ.एफ.) यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला.

• उक्त अहवालातील नमूद निष्कर्षाबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कार्यवाही पुर्तता अहवाल शपथपत्राद्वारे मा.उच्च न्यायालयात सादर केलेला आहे.

(३) ना-विकास व सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्रामध्ये माती भराव केल्याने मौजे उत्तन येथे दि. ११.०६.२०१८ रोजी व गौरव सिटी मिरा रोड येथे दि.१५.०६.२०१८ रोजी पोलीस स्टेशनमध्ये संबंधितांविरूध्द महानगरपालिकेने गुन्हे दाखल केले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(४) व (५) • अशा आशयाच्या तक्रारी देखील महापालिका प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत.

• माती भराव रोखण्यासाठी पथकाची नियुक्ती केली असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

• खाडीलगत डेब्रिज टाकून सपाटीकरण केलेली जागा ही मिठागर विभागाची असल्याने त्यावर उभारलेल्या अनधिकृत झोपड्या तोडण्याची कार्यवाही संयुक्तपणे करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात मोटार सायकलींची होत असलेली चोरी

**(७५) * ११८४२१ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात गत १३८ दिवसांत चोरट्यांनी १७४ मोटारसायकली पळवून नेल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती मोटारसायकलींचा शोध लागला असून किती जणांना अटक केली तसेच त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, मोटारसायकलींची चोरी रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलिस आयुक्तालय नाशिक शहर हद्दीत दि.०१.०१.२०१८ ते ३१.०५.२०१८ या कालावधीत मोटारसायकल चोरीचे १७५ गुन्हे दाखल आहेत.

(२) माहे जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत करण्यात आलेली कार्यवाही

| मो.सा.चोरी एकुण दाखल गुन्हे | मो.सा.चोरी उघड गुन्हे | अटक आरोपी संख्या | केलेली कार्यवाही. |
|---|---|---|---|
| १७५ | ४६ | ५९ | गुन्हे दाखल करून उघडकीस आलेल्या गुन्हयांमध्ये ५९ आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्हयांचा तपास पुर्ण करून आरोपीतांविरूध्द मा.न्यायाल यात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |

(३) नाशिक पोलिस आयुक्तालय हद्दीत मोटारसायकल चोरीला प्रतिबंध होण्यासाठी अभिलेखावरील गुन्हेगारांना वारंवार चेक केले जाते. नाकाबंदीद्वारे वाहन तपासणी/जेल रिलिज गुन्हेगारांची नियमित तपासणी केली जाते. गर्दीच्या ठिकाणी/सार्वजनिक ठिकाणी/पार्किंगच्या ठिकाणी रहिवासी नागरिकांमध्ये मोटारसायकल चोरी न होण्यासाठी योग्य त्या सूचना देवून जनजागृती केली जाते. पेट्रोलिंग दरम्यान अचानकपणे वाहनांची कागदपत्र पडताळणी केली जाते.

गॅरेज चालकांना चोरीचे अगर संशयित वाहन आल्यास त्याबाबत त्वरीत माहिती देण्याच्या, डुप्लिकेट चावी बनविणारे/नंबर प्लेट तयार करणारे यांना मोटार वाहन मालकांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. बेवारस मोटारसायकल/वाहन मिळून आल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून माहिती घेवून वाहन मालकाचा शोध घेतला जातो. पोलिस ठाण्यांकडील पिटर मोबाईल/सि.आर मोबाईल/डी.बी मोबाईल/बिट मार्शल यांचेकडून सतत गस्त घालण्यात येते. वाहन चोरी घडलेल्या ठिकाणांचा डम डाटा प्राप्त करून तो ॲनालिसिस करून गुन्हे उघडकीस आणण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न केले जातात.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये ई -निविदा गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण होऊनही दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई होत नसल्याबाबत

**(७६) * १२१८४२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये ई-निविदा गैरव्यवहार, रस्ते गैरव्यवहार व नालेसफाई गैरव्यवहार यापैकी ई-निविदा गैरव्यवहार सर्वप्रथम निदर्शनास आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते गैरव्यवहार व नालेसफाई गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण होऊन दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुद्ध नाममात्र कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ई-निविदा गैरव्यवहार हा रस्ते गैरव्यवहार व नालेसफाई गैरव्यवहाराच्या अगोदरचा असूनही त्या गैरव्यवहारात पी/उत्तर विभागाचे तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांच्यासह ८४ अधिकाऱ्यांची चौकशी पूर्ण होऊनही बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध अद्यापपर्यंत हेतुपुरस्सरपणे कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये ई-निविदा गैरव्यवहारातील दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेस सन २०१३-१४ मध्ये ई-निविदा अनियमिततेबाबतची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने उपायुक्त, परिमंडळ-१ यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली. सदर प्राथमिक चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने तीन उपायुक्तांच्या त्रिसदस्यीय समितीमार्फत सर्वंकष चौकशी करण्यात येत आहे.

(२) रस्ते व नालेसफाई घोटाळा चौकशी प्रकरणात दोषसिध्दतेच्या प्रमाणात दोषी अधिकारी/कर्मचारी व कंत्राटदार यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

रस्ते गैरव्यवहार :-

• टप्पा-१ अंतर्गत ९६ अभियंते व टप्पा-२ अंतर्गत १६७ अभियंते दोषी आढळले असून उपरोक्त दोन्ही चौकशीमध्ये ८४ अभियंते सामायिक आहेत.

• सामायिक असलेल्या ८४ अभियंत्यांविरुध्द दोन्ही टप्प्यात केलेल्या चौकशीमध्ये जास्त असलेली शिक्षा अंतिम करण्यात आली आहे.

• ३ कंत्राटदार व २ त्रयस्त पक्ष गुणवत्ता लेखापरिक्षक यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

• ६ कंत्राटदार व २ त्रयस्थ पक्ष गुणवत्ता लेखापरिक्षक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

• सदर प्रकरणी टप्पा-२ च्या अनुषंगाने, एकूण ११ कंत्राटदारांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, त्यांची सुनावणी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

नालेसफाई गैरव्यवहार :-

• १३ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याबाबत खात्यांतर्गत चौकशी पूर्ण झाली असून शिक्षादेश बजाविण्यात आले आहेत.

• मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटांसंबंधीत कर्मचारी व अधिकारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांच्याविरुद्ध खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीची कारवाई करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ८० कर्मचाऱ्यांवर ९६ दोषारोपपत्रे व निलंबित करण्यात आलेल्या १३ कर्मचाऱ्यांवर पुरवणी दोषारोपपत्रे अशी एकूण १०९ दोषारोपपत्रे बजाविण्यात आली आहेत.

• २४ नालेसफाई आणि २ व्ही.टी.एस. कंत्राटदार तसेच ८ वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुद्ध आर्थिक गुन्हे विभागाकडे दिनांक ३०.१२.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

• २४ नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले असून, त्याअंतर्गत त्यांच्यावर बजाविण्यात आलेल्या बोलक्या आदेशाविरुध्द (speaking order) संबंधित कंत्राटदारांनी सादर केलेल्या अपिलाच्या

अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांच्यामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्राथमिक चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने तीन उपायुक्तांच्या त्रिसदस्यीय समितीमार्फत ८४ अधिकारी / कर्मचाऱ्यांची खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्यात येत आहे.

(४) चौकशी अहवालाअंती सिध्द होणाऱ्या अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शिक्षेची कारवाई बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्यासाठी खरेदी करण्यात आलेले कॅमेरे गायब झाल्याबाबत

**(७७) * ११७१५१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या ३० कॅमेऱ्यांपैकी १० कॅमेरे गायब झाल्याचे तसेच कॅमेरे खरेदीबाबतची नस्ती देखील गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त घटनेबाबत पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, तसेच गुन्हयाच्या तपासाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पट संख्येसाठी शाळेतील विद्यार्थ्यांचे फोटो काढण्याकरिता एकूण ३० कॅमेरे खरेदी करण्यात आलेले होते.

सदरचे कॅमेरे तत्कालिन सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यांच्या अखत्यारित होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सदरचे कार्यालय स्थलांतरीत झाले आहे.

यावेळी या कार्यालयातील अभिलेख /नस्त्या/ साहित्य स्थानांतरित करताना ३० कॅमेऱ्यापैकी १० कॅमेरे व कॅमेऱ्याच्या खरेदीबाबतची मूळ नस्तीही आढळून आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणातील संबंधीत कर्मचा-यांनी 'अंडर पोष्ट' जबाबदारी स्विकारुन १० कॅमेऱ्यांची मूळ निविदा किंमतीनुसार येणारी रक्कम रु.१,०९,९००/- महानगरपालिकेकडे जमा केलेली आहे.

तसेच या प्रकरणाबाबत सदर पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/०५/२०१८ रोजी महानगरपालिकेच्या वतीने रितसर तक्रार दाखल केलेली आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.